नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com



नाताळ सणाच्या सर्वांना शुभेच्छा!

* वर्ष ५२ * अंक १७२ *   * अकोला *   गुरुवार, दिनांक २५ डिसेंबर २०२५   ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

अग्राग्रलेख

## खरीखरी..

## रुसलेले मुनगंटीवार

गेल्या काही दिवसांपासून किंबहुना या मंत्रिमंडळाच्या निर्मितीनंतर सुधीर भाऊंना मंत्रिमंडळात न घेतल्यामुळे त्यांना धक्का बसणे स्वाभाविक आहे. २०१४ साली महाराष्ट्रात मुख्यमंत्रीपदाचा चेहरा म्हणून सुधीर भाऊंचे नाव वारंवार घेतले जात होते. त्यावेळी मोदी यांच्या नावाची जादू भारतभर पसरली होती. मात्र मोदी यांनी राज्यात नवे नवे चेहरे पेरण्याचा आणि प्रस्थापितांना बाजूला ठेवण्याचा नियम अगदी सुरुवातीपासून पाळलेला आहे. गुजरात घ्या, छत्तीसगड घ्या, राजस्थान घ्या, हरियाणा घ्या, मध्य प्रदेश घ्या, सर्व ठिकाणी नवे चेहरे आणून बसवण्याचे कार्य मोदीजींनी अगदी डंके की चोट पर, केलेले आहे. त्यामुळेच २०१४ सालात महाराष्ट्राचे नेतृत्व करू शकेल असा चेहरा म्हणून तत्कालीन आमदार देवेंद्र फडणवीस यांना निवडले गेले. त्याकाळी पाच वर्षे ते मुख्यमंत्री होते आणि त्या पाच वर्षात त्यांनी उत्तम कारभार करून महाराष्ट्राला प्रभावशाली सरकार दिले होते. त्यानंतरच्या काळात महाराष्ट्राची राजकीय परिस्थिती अत्यंत विचित्र झाली होती. शिवसेनेच्या पाठिंब्याशिवाय मंत्रिमंडळ स्थापन करणे शक्यच होणारे नव्हते. त्यानंतर उद्धव रावांनी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस बरोबर हातमिळवणी केली आणि आपल्या नेतृत्वाखाली महाविकास आघाडीचे मंत्रिमंडळ बनवले. हे राजकारण तत्कालीन विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांना विचलित करीत होते. त्यांनी त्यावेळी शिवसेनेतील कच्चे दुवे शोधले आणि एका अभूतपूर्व परिस्थिती नंतर देवेंद्रजींनी युतीचे मंत्रिमंडळ स्थापन केले, तेव्हा मोदीजींनी एका क्षणात देवेंद्रजी यांच्या ऐवजी एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्रीपद बहाल केले. लगेचच लोकसभा निवडणूक आली. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रातून भारतीय जनता पक्षाला अत्यंत कमी खासदार मिळाल्यानंतर विधानसभेच्या निवडणुकीसाठी देवा भाऊंनी कंबर कसली आणि भारतीय जनता पक्षाला 'न भूतो न भविष्यती' असा विजय मिळाला, यावेळी मंत्रिमंडळ बनवताना सुधीर भाऊंना वगळण्यात आले. सुधीर भाऊ मुनगंटीवार विदभार्तील सर्वात जुने प्रभावी नेते होते. नितीनजी गडकरी यांच्यासोबत त्यांचे अत्यंत निकटचे संबंध होते. सुधीर भाऊंना केवळ विदर्भच नव्हे तर महाराष्ट्राच्या राजकारणाची खडा न खडा माहिती होती. सुरुवातीला प्रचंड बहुमत मिळाल्यामुळे नवे सरकार स्थापन करताना कोणाच्याही राजीनाराजीची पर्वा न करता नवे मंत्रिमंडळ बनविण्यात आले. त्यापूर्वी लोकसभेसाठी सुधीर भाऊंना चंद्रपूर मधून उमेदवारी देण्यात आली होती, तिथे सुधीर भाऊंना विजय मिळाला असता तर ते इच्छा नसतानाही दिल्लीचे रहिवासी झाले असते. सुधीर भाऊ विजयी झाले नाहीत. उलट त्यामुळे त्यांना आनंद झाला होता असे कित्येक लोक म्हणतात. विधानसभेच्या निकालानंतर केंद्रात न गेलेल्या सुधीर भाऊंना राज्याच्या राजकारणातून ही बाजूला केले गेले. हा घटनाक्रम पाहता सुधीर मुनगंटीवार यांना मंत्रिमंडळात घेतले नाही याचे सुतोवाच त्यांच्या लोकसभेच्या उमेदवारी बरोबरच झालेले होते असे आम्हाला वाटते. सुधीर भाऊ अत्यंत कार्यक्षम आहेत, हुशार आहेत, सरकारचा कारभार कसा चालवावा या बाबतीमध्ये ते पारंगत आहेत. त्यांच्यातील हे गुणच त्यांना सत्ता प्राप्ती पासून वंचित करून गेले की काय, असे आता आम्हाला वाटायला लागलेले आहे. अन्यथा सुधीर भाऊ यांच्यासारखा परिपक्व नेता प्रस्थापित राजकारणाच्या बाबतीत अशा प्रकारे भाष्य करू शकला नसता. सुधीर भाऊ व्यक्तिशः कसे आहेत हे आम्ही सांगायची गरज नाही. सत्ता हाती आल्यावर निश्चितच कार्यकर्ते आणि जनतेबरोबर तेवढे संबंध ठेवता येत नाहीत, हेही खरे आहे. परंतु सुधीर भाऊंनी आपला मतदारसंघ उत्तम रीतीने राखला यामध्ये शंकाच नाही. सुधीर मुनगंटीवार यांचे पिताश्री संघाचे कट्टर कार्यकर्ते होते. कारण जेव्हा निवडून येण्याची शाश्वती नव्हती, तेव्हा त्यांनी भारतीय जनता पक्षाच्या तिकिटावर निवडणूक लढवली होती. अशा प्रकारे मुनगंटीवार घराणे संपूर्णपणे भारतीय जनता पक्षाला समर्पित असतानाही आपल्याला ज्या पद्धतीने बाजूला केले गेले, ती खंत त्यांना मनात ठेवता आली नाही. दुखावलेल्या सुधीर भाऊंना राजकारणात बरेच काही करायचे आहे, त्यांनी थोडा धीर धरला पाहिजे. एवढाच आमचा प्रेमाचा सल्ला आहे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# शिवसेना ठाकरे गट आणि मनसेची
# अधिकृत युती जाहीर!

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २४ :

महाराष्ट्राच्या राजकारणात आज इतिहास घडला. दोन दशकांहून अधिक काळ मराठी मनात घोळत असलेला प्रश्न अखेर संपला. आणि यांनी मुंबई महापालिका निवडणुकांसाठी अधिकृत युती जाहीर करत विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकवली. ही घोषणा केवळ निवडणूक गणित नाही, तर मराठी अस्मितेचा थेट रणशिंगनाद आहे, असा ठाम सूर दोघांनीही आळवला.

संयुक्त पत्रकार परिषदेत ठाकरे बंधूंनी जागावाटप, नेतृत्व आणि महापौरपद या तिन्ही मुद्द्यांवर स्पष्ट भूमिका मांडत संभ्रमाचे धुके दूर केले. ‣मराठी माणसाचा हक्क, मुंबईचा स्वाभिमान आणि महाराष्ट्राचे भवितव्य‣—या तीन ध्येयांसाठी मतभेद बाजूला ठेवून आम्ही एकत्र आलो आहोत, असा ठाम निर्धार व्यक्त झाला.

आजचा दिवस सुवर्णाक्षरांनी लिहिला जाईल. संयुक्त महाराष्ट्राचा मंगल कलश जसा आला, तसाच आज मराठी ऐक्याचा मंगल कलश उद्धव‣राज यांच्या रूपाने आला आहे. मुंबईसह सर्व महापालिकांवर आता भगवा फडकणार, असा थेट दावा त्यांनी केला.

उद्धव ठाकरे यांनी भाषणात आक्रमक भूमिका घेत दिल्लीच्या सत्ताकेंद्रांवर आणि भाजपच्या नरेटिव्हवर घणाघाती हल्ला चढवला. प्रबोधनकार ठाकरे आणि बाळासाहेब ठाकरे यांनी मुंबईसाठी रक्त सांडले. आज मुंबई महाराष्ट्रापासून तोडण्याची स्वप्नं पाहिली जात आहेत.



आम्ही कर्तव्य म्हणून एकत्र आलो आहोत—हे नाते तुटणार नाही. कटेंगे तो बटेंगे म्हणणाऱ्यांना मी सांगतो, चुकाल तर संपल. मराठी माणसाने आता एकत्र येण्याची हीच वेळ आहे, असा इशारा त्यांनी दिला.

राज ठाकरे यांनी युतीमागची वैचारिक धार स्पष्ट करताना राजकीय दलालशाहीवर निशाणा साधला. कोणत्याही भांडणापेक्षा महाराष्ट्र मोठा आहे—मी हे आधीच सांगितलं होतं. आज राज्यात पक्ष पळवणाऱ्या टोळ्या फिरत आहेत. महाराष्ट्राला स्थिरतेची गरज आहे. ही युती फक्त निवडणुकीपुरती नाही; महाराष्ट्राच्या हितासाठीची आहे. मुंबईची युती ही पहिली पायरी आहे. मुंबईचा महापौर मराठीच असेल—आणि आमचाच असेल, असा संदेश त्यांनी दिला.

या घोषणेनंतर राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. विरोधकांसाठी ही थेट आव्हानाची घंटा असून, सत्ताधाऱ्यांना आता मराठी ऐक्याच्या वादळाला सामोरे जावे लागणार आहे. मुंबई महापालिकेच्या रणांगणात ठाकरे बंधू एकत्र उतरल्याने समीकरणे उलथून पडली आहेत.

### अस्तित्व टिकवण्यासाठी दोन पक्ष एकत्र फडणवीसांचा टोला



उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या युतीची अधिकृत घोषणा झाल्यानंतर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या युतीचा समाचार घेतला आहे. ‣काही प्रसारमाध्यमे हे दृश्य असे दाखवत आहेत की जणू रशिया आणि युक्रेनची युती होत आहे. एकीकडून पुतीन आणि दुसरीकडून झेलेन्स्की निघाले आहेत, असे चित्र उभे केले जात आहे. मात्र, ही युती केवळ स्वतःचे अस्तित्व टिकवण्यासाठी दोन पक्ष एकत्र आलेले आहेत. ठाकरे बंधू म्हणजे मुंबई किंवा मराठी नाही, अशा शब्दांत फडणवीस यांनी राज-उद्धव यांच्या युतीची खिल्ली उडवली.

फडणवीस म्हणाले, ठाकरे बंधू एकत्र आले याचा मला आनंदच आहे. पण ते एकत्र आल्याने राजकीयदृष्ट्या फार काहीतरी घडेल असा जर कुणाचा समज असेल तर तो बाळबोध समज आहे. कुठल्याही एका पक्षाला निवडणुकीत आपले अस्तित्व टिकवण्यासाठी जे काही करावे लागते, त्या दृष्टीने दोन अस्तित्वहीन पक्षांनी केलेली ही युती आहे. या पलीकडे याचा कोणताही अन्वयार्थ काढण्याचे कारण नाही. या युतीने महायुतीवर कोणताही परिणाम होणार नाही, असे फडणवीस म्हणालेत.

ठाकरे बंधुंच्या युतीने फार काही परिणाम होईल, असे देखील मला वाटत नाही. ज्याप्रकारे मुंबईकरांचा विश्वासघात या मंडळींना सातत्याने केलाय. मराठी माणसाला मुंबईच्या बाहेर घालवण्याचे काम आणि पाप यांनी केलेल आहे. त्यामुळे मराठी माणुसही यांच्यासोबत नसल्याचे ते म्हणाले.

## ते मुंबई काय सांभाळणार?

### ठाकरे बंधूंच्या युतीवर शिंदेंचा टोला

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २४ :



मुंबई महापालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना ठाकरे गट आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची युती झाली असून उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी पत्रकार परिषद घेत याची अधिकृत घोषणा केली आहे.

ठाकरे बंधूंच्या युतीवर आता शिवसेना शिंदे गटाचे नेते व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी टीका केली आहे. आता झालेली युती ही सत्तेसाठी असल्याची टीका त्यांनी केली आहे. तसेच ज्यांना आपली पोरं सांभाळता आली नाही ते राज्य काय सांभाळणार? असा तिखट सवालही शिंदेंनी उपस्थित केला.

शिंदे म्हणाले, काही युत्या या जनतेच्या विकासासाठी होतात, महायुती ही जनतेच्या विकासासाठी, मुंबईच्या विकासासाठी आहे. पण आता झालेली युती ही सत्तेसाठी आहे. निवडणुका आल्यावरच यांना मराठी माणूस आठवतो, असा टोला शिंदेंनी लगावला आहे. तसेच युती कोणाची कोणाशीही झाली तरी आमची महायुती ही महाराष्ट्रामध्ये मजबुतीने उभी आहे. लोकसभा विधानसभा, नगरपालिकांमध्ये महायुती जिंकली. त्यामुळे अशा सत्तेसाठी झालेल्या युत्यांमुळे काही फरक पडत नाही, असेही शिंदे म्हणाले.

पुढे बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले, मुंबई महापालिकेकडे यांनी सोन्याची अंडी देणारी कोंबडी म्हणून पाहिली. आता ही कोंबडीच कापून खायचे काम सुरू आहे. ठाकरे बंधूंची झालेली युती ही स्वाथार्साठी आणि अस्तित्व टिकवण्यासाठी आहे. परंतु, जनता त्यांना त्यांची जागा दाखवणार. ठाकरे बंधूंची युती झाली तरीही विठ्ठल आमच्याकडे आहे, असे शिंदे म्हणाले.

यांच्याकडे मुंबईच्या विकासाचा अजेंडा नाही. त्यांच्या प्रेस कॉन्फरन्समध्ये विकासावर एकही शब्द बोलले नाहीत. यांचा अजेंडा हा फक्त सत्तेसाठी आहे. बाळसाहेबांचा विचार ज्यांनी सोडला त्यांना राज्यातल्या जनतेने त्यांची जागा दाखवली आहे. असली काय आणि नकली काय हे नगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये दाखवले आहे, आम्ही विचारधारेला पुढे घेऊन जाणारे आहोत. मुंबईचा विकास हाच आमचा अजेंडा आहे. त्यांनी मुंबईसाठी काय केले हे सांगावे. मुंबईकर हा मुंबईच्या बाहेर फेकला गेला तो यांच्यामुळे, असेही शिंदे यावेळी म्हणाले.

## मुंबईचा महापौर मराठीच आणि आमचाच होणार!

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २४ :

कोणत्याही वादापेक्षा आणि भांडणापेक्षा महाराष्ट्र मोठा आहे, या भावनेतून शिवसेना आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना (मनसे) यांच्यात ऐतिहासिक युती झाल्याची अधिकृत घोषणा आज राज ठाकरे यांनी केली.

मुंबई महापालिकेच्या महासंग्रामासाठी दोन्ही ठाकरे बंधू एकत्र आले असून, मुंबईचा महापौर मराठीच होणार आणि तो आमचाच असणार, असा बुलंद विश्वास राज ठाकरे यांनी यावेळी व्यक्त केला. आम्ही आमची भूमिका जाहीर सभांतून मांडणार असल्याचे राज ठाकरे म्हणाले.

माझी एक मुलाखत झाली होती. त्यात मी असे म्हटले होते की, कुठल्याही वादापेक्षा आणि भांडणापेक्षा महाराष्ट्र मोठा आहे. आम्ही एकत्र येण्याची सुरुवात त्या वाक्यापासून झाली. कोण किती जागा लढवणार? आकडा काय? हे नाही सांगणार. महाराष्ट्रात सध्या लहान मुले पळण्याच्या टोळ्या फिरत आहेत. त्यात दोन टोळ्या आणखी ॲड झाल्यात. ते राजकीय पक्षांमधील मुले पळवतात. जे निवडणुका लढवणार आहेत. त्या सर्व उमेदवारांना दोन्ही पक्षांकडून उमेदवारी दिली जाईत. ती कधी आणि केव्हा भरायची ते कळवले जाईल.

बरेच दिवसा ज्याची प्रतिक्षा महाराष्ट्र करत होता, ती शिवसेना आणि मनसेची युती झाल्याचे आज जाहीर करत आहोत, अशी घोषणा राज ठाकरे यांनी केली. मुंबईचा महापौर मराठीच होणार आणि आमचाच होणार, असा विश्वासही राज ठाकरे यांनी व्यक्त केला.

भाजप नेते रावसाहेब दानवे यांचा राज ठाकरेंनी समाचार घेत त्यांना दानव अशी उपमा दिली.

## आघाडी फुटली?

### शरद पवारांचा मोठा निर्णय

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २४ :

मुंबई महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राच्या राजकारणात मोठी उलथापालथ घडताना दिसत आहे. मनसे आणि शिवसेना (ठाकरे गट) यांची अधिकृत युती जाहीर होताच, महाविकास आघाडीच्या भवितव्यावर प्रश्नचिन्ह उभं राहिलं आहे. कारण या युतीनंतर आता राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)कडून दिशा बदलण्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत.

शिवसेना (उद्धव ठाकरे गट) आणि मनसे यांची युती जाहीर झाली असली, तरी मुंबई महापालिकेतील जागावाटपाचं सूत्र मात्र अजून स्पष्ट झालेलं नाही. मनसेला किती जागा? ठाकरे गट किती जागांवर लढणार? हे प्रश्न अनुत्तरित आहेत.

दरम्यान, या घडामोडींमध्ये सर्वात मोठी बातमी समोर आली आहे ती म्हणजे यांचा निर्णय. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)ने शिवसेना ठाकरे गटासोबतची युतीची बोलणी थांबवली आहेत.

याआधी मुंबई महापालिकेसाठी मनसे-शिवसेना (उबाठा)-राष्ट्रवादी (शरद पवार गट) अशी त्रिसूत्री युती होणार असल्याची जोरदार चर्चा होती. इतकंच नाही, तर ठाकरे गट आपल्या कोट्यातून शरद पवार गटाला जागा देण्यास तयार असल्याच्याही बातम्या समोर आल्या होत्या. मात्र आता ही शक्यता मावळताना दिसत आहे.

आता राष्ट्रवादी शरद पवार गट मुंबई महापालिकेत काँग्रेससोबत युती करू शकतो. काँग्रेसने सुरुवातीपासूनच मनसेसोबत युती न करण्याची ठाम भूमिका घेतली होती. काँग्रेस आणि राष्ट्रवादी (शप) एकत्र येण्याचा पर्याय अधिक व्यवहार्य मानला जात आहे.

## तैवानमध्ये भूकंप



■ वृत्तसंस्था, तैपेई, दि. २४ :

तैवानच्या आग्नेय भागात बुधवारी संध्याकाळी ५:४७ वाजता ६.१ तीव्रतेचा भूकंप झाला आहे. कोणत्याही नुकसानीची नोंद झालेली नाही. याचे धक्के चीन, फिलिपिन्स आणि जपानपर्यंत जाणवले.

केंद्रीय हवामान प्रशासनानुसार, भूकंपाचे केंद्र तैतुंग काउंटी हॉलपासून १९.१ किलोमीटर उत्तरेला होते आणि त्याची खोली ११.९ किलोमीटर होती. भुकंपामुळे नुकसानीची माहिती अद्याप नाही.

## सदानंद दाते होणार नवे पोलीस महासंचालक

### महाराष्ट्र केडरमध्ये घरवापसी

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २४ :



राष्ट्रीय तपास संस्थेचे (एनआयए) महासंचालक सदानंद वसंत दाते यांना केंद्र सरकारने तत्काळ प्रभावाने महाराष्ट्र केडरमध्ये पाठवले आहे. १९९० बॅचचे अत्यंत प्रामाणिक आणि कर्तव्यदक्ष आयपीएस अधिकारी म्हणून ओळखले जाणारे दाते आता महाराष्ट्राचे नवे पोलिस महासंचालक होण्याची दाट शक्यता आहे.

केंद्रीय मंत्रिमंडळाच्या नियुक्ती समितीने २२ डिसेंबर रोजी याबाबतचा आदेश जारी केला. राज्याच्या पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला ३१ डिसेंबर २०२५ रोजी निवृत्त होत असल्याची माहिती आहे.

## काँग्रेस आणि रासप मनपा व जिल्हा परिषद एकत्र लढणार

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि.२४ :

राज्यातील नगरपालिका निवडणुकीनंतर होत असलेल्या मनपा व जिल्हा परिषद निवडणुकांसाठी काँग्रेस पक्ष सज्ज आहे. नगरपालिका निवडणुकाप्रमाणेच या निवडणुकीतही समविचारी पक्षांना सोबत घेण्याची काँग्रेसची भूमिका आहे. महानगरपालिका व जिल्हा परिषद निवडणुकांमध्ये काँग्रेस व राष्ट्रीय समाज पक्ष एकत्र लढणार असल्याचे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी जाहीर केले.



टिळक भवन येथे आज राष्ट्रीय समाज पक्षाचे अध्यक्ष माजी मंत्री महादेव जानकर व काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्यात आज आघाडीबाबत सविस्तर चर्चा झाली. त्यानंतर दोन्ही नेत्यांनी पत्रकार परिषदेत आघाडीची घोषणा केली.

सपकाळ म्हणाले की, महादेव जानकर हे बहुजन समाजाचा आश्वासक आवाज आहेत. त्यांच्याशी आघाडी करून आम्ही निवडणुका लढवणार आहोत.

## आता नगराध्यक्षांनाही मिळणार मताचा अधिकार

### मंत्रिमंडळाचा निर्णय : सरकार कायद्यात सुधारणा करण्यासाठी काढणार अध्यादेश

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि.२४ :

राज्य सरकारने आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या थेट निवडून आलेल्या अध्यक्षास सदस्यत्व देण्यासह मताचाही अधिकार देण्याचा निर्णय घेतला आहे.

यामुळे भविष्यात स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये बहुमताचा प्रश्न उद्भवला तर नगराध्यक्षांना आपले मत योग्य त्या पक्षाच्या पारड्यात टाकून प्रकरण निकाली काढता येणार आहे. हा बदल सत्ताधाऱ्यांना अनुकूल असल्याचा दावा केला जात आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात आज राज्य मंत्रिमंडळाची बैठक झाली. या बैठकीत सामान्य प्रशासन विभाग, ग्रामविकास व पंचायत राज विभाग, महसूल व नगरविकास विभागाशी संबधित प्रत्येकी १ निर्णय घेण्यात आला.

थेट निवडून आलेल्या आणि सदस्यांमधून निवडून आलेल्या अध्यक्षास जनादेश असतोच. त्यामुळे या सुधारणेनुसार आता अध्यक्ष म्हणून थेट निवडून आलेली व्यक्ती आणि सदस्य म्हणून थेट निवडून आलेली व्यक्ती एकाचवेळी दोन्ही पदे धारण करू शकते, अशी सुधारणा करण्यात येणार आहे.

तसेच अध्यक्षाला सदस्य म्हणून एक मत देण्याचा अधिकार मिळणार आहे. अशा व्यक्तिला अध्यक्ष किंवा सदस्य म्हणून एक मत देण्याचा अधिकार असेल आणि मतांची बरोबरी झाल्यास, अध्यक्षाला निर्णायक मत देण्याचा अधिकार राहणार आहे, अशी सुधारणा या अधिनियमात केली जाणार आहे.


ग्राम, तालुका व जिल्हा प्रशासन सक्षम करण्यासाठी जिल्हा कर्मयोगी २.० व सरपंच संवाद कार्यक्रम राबविणार.
धाराशिव शहरात साहित्य सम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा उभारण्यासाठी दुग्धव्यवसाय विकास विभागाची एक एकर जागा.


### २९१ आरोग्य सेविकांच्या नियुक्त्या नियमित

राज्यातील जिल्हा परिषदांतर्गत आरोग्य विभागामध्ये कार्यरत आणि सेवानिवृत्त झालेल्या बंधपत्रित २९१ आरोग्य सेविकांच्या नियुक्त्या नियमित करण्याबाबत विभागीय आयुक्तांना अधिकार देण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. जिल्हा परिषदांमध्ये कार्यरत असलेल्या २९१ बंधपत्रित आरोग्य सेविकांना राज्य सरकारच्या या निर्णयाचा लाभ होणार आहे.

ब्रम्हपुरी नगर परिषद
प्रभाग क्रमांक ८ मधून
भारतीय राष्ट्रीय काँग्रेस
पक्षाचे नगरसेवक म्हणून निवडून दिल्याबद्दल
प्रभागातील सर्व सन्माननीय
मतदार बंधू भगिनींचे









गटनेते
नगरसेवक
डॉ. नितीन उराडे
प्रभाग क्र. ८

नगरसेविका
सौ. पुष्पलता
सुधाकर पोपटे
प्रभाग क्र. ८

# शिंदे आणि चव्हाणात मॅरेथॉन चर्चा

## लवकरच पहिली यादी येण्याची शक्यता



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २४ :** राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी सर्व राजकीय पक्षांनी रणशिंग फुंकले गेले असून, या पार्श्वभूमीवर महायुतीने आपली पूर्ण ताकद मैदानात उतरवली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्यात जागावाटपाबाबत मॅरेथॉन बैठक रंगली.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ठाणे येथील निवासस्थानी ही बैठक पार पडली. या बैठकीत मुंबई, ठाण्यासह राज्यातील प्रमुख महापालिकांच्या जागावाटपाचा पेच सुटल्याची चिन्हे असून, लवकरच महायुतीकडून उमेदवारांची पहिली यादी जाहीर होण्याची शक्यता आहे.

निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार, राज्यातील २९ महापालिकांसाठी १५ जानेवारी रोजी मतदान होणार असून, १६ जानेवारीला निकाल जाहीर होतील. या अल्प कालावधीत प्रभावी मोचेबांधणी करण्यासाठी महायुतीच्या नेत्यांनी रात्रीचा दिवस केला आहे.

एकीकडे आज शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या युतीची आज घोषणा होणार आहे. तर दुसरीकडे महायुतीतील भाजप आणि शिवसेना शिंदे गट यांच्यातही युतीबाबत चर्चा सुरू आहे. ठाण्यातील बैठकीत भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तब्बल ५ तास चर्चा करून अनेक जागांवर एकमत घडवून आणल्याचे समजते.

मिळालेल्या माहितीनुसार, शिवसेना शिंदे गट आणि भाजपमधील जागावाटपाची चर्चा आता अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत लवकरच युतीची अधिकृत घोषणा केली जाईल. मुंबई महापालिकेत कोणता पक्ष किती जागा लढवणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले असून, येत्या काही तासांत उमेदवारांची पहिली यादी प्रसिद्ध होण्याची दाट शक्यता आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेना आमदार आणि माजी नगरसेवकांची विशेष बैठक घेतली. या बैठकीत त्यांनी अत्यंत आक्रमक पवित्रा घेत सूचना दिल्या आहेत. सर्व आमदारांनी आपापल्या मतदारसंघात तळ ठोकून राहावे. नगरसेवकांनी निवडणुकीचा निकाल लागेपर्यंत आपला वॉर्ड सोडू नये. भाजप आणि शिवसेना कार्यकर्त्यांमध्ये स्थानिक पातळीवर कोणताही वाद होणार नाही, याची काळजी घेण्याचे आदेश एकनाथ शिंदे यांनी आमदार आणि नगरसेवकांना दिले आहेत.

या राजकीय घडामोडींमध्ये उद्योगमंत्री उदय सामंत यांची भूमिका महत्त्वाची ठरत आहे. त्यांना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तातडीने रत्नागिरीहून मुंबईला बोलावून घेतले. सामंत यांनी आधी एकनाथ शिंदे यांची आणि त्यानंतर 'वर्षा' निवासस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. या त्रिपक्षीय चर्चेत जागावाटपाचे अंतिम सूत्र निश्चित झाल्याचे सूत्रांकडून समजते.

## न्याय मिळाला नाही तर वेगळा विचार करू....



■ **मुंबई :** मुंबईसह राज्यातील महत्त्वाच्या महानगरपालिकांच्या निवडणुकांसाठी उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे आज आपली युती जाहीर करत असतानाच, महाविकास आघाडीतील मित्रपक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने आक्रमक पवित्रा घेतला आहे.

ठाकरे बंधू आम्हाला न्याय देत नसतील, तर आम्हाला काँग्रेससोबत वेगळा निर्णय घ्यावा लागेल, अशा शब्दांत आमदार रोहित पवार यांनी 'अल्टिमेटम' दिला आहे. मुंबई महापालिकेसाठी ठाकरे गटाकडून राष्ट्रवादीला केवळ १५ जागांची ऑफर दिली जात असल्याने रोहित पवारांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

रोहित पवार माध्यमांशी बोलताना म्हणाले की, आमच्या पक्षाच्या नेत्यांनी कालच ठाकरे बंधूंची भेट घेऊन आम्हाला कोणत्या जागा हव्या आहेत, याची कल्पना दिली आहे. मात्र, ठाकरे बंधू आम्हाला केवळ १५ जागा देण्यास इच्छुक असून त्यातील बहुतांश जागा निवडून येण्यासारख्या नाहीत. त्यांनी हट्ट न धरता जिंकणाऱ्या उमेदवारांना संधी द्यावी. महाविकास आघाडी म्हणून एकत्र आले पाहिजे यासाठी आमचा प्रयत्न असेल. ठाकरे बंधुंनी एकत्र लढायचे आणि कुणाला घ्यायच नाही असे ठरवले तर आम्ही आणि काँग्रेस एकत्र लढू. जर पुढच्या दोन दिवसांत आम्हाला समाधानकारक निर्णय मिळाला नाही, तर आम्ही स्वबळावर किंवा काँग्रेससोबत एकत्र लढण्याबाबत विचार करू.

## नाराजी घरी चालते... सुप्रिया सुळेंनी सुनावले

■ **पुणे :** पुणे महापालिकेच्या निवडणुकीत राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांची युती होण्याची शक्यता आहे. पण शरद पवार गटाचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी त्याला कडाडून विरोध केला आहे. खासदार सुप्रिया सुळे यांनी बुधवारी त्यांना चांगलेच खडेबोल सुनावले. नाराजी घरी चालते, समाजात काम करताना नाही, असे त्या म्हणाल्या.



सुप्रिया सुळे आज पत्रकारांशी बोलताना म्हणाल्या, प्रशांत जगताप यांनी उपस्थित केलेले प्रश्न रास्त आहेत. पण सगळ्या कार्यकर्त्यांचे मत महत्त्वाचे आहे. ही निवडणूक आहे. अशी नाराजी घरी चालते. नाराजी लोकशाहीत मान्य नाही. अशी नाराजी पक्षात चालत नाही. समाजात काम करताना नाराजी चालत नाही. मी येथे पक्षाच्या बैठकीला आले आहे. गत अनेक दिवस संसदेचे अधिवेशन सुरू होते. त्यात अनेक विधेयके सादर करण्यात आली. मी अतिशय महत्त्वाच्या वेळी दिल्लीत होते. आज महापालिका निवडणुकीविषयी काय निर्णय घ्यायचा याचा आढावा घेतला जाईल.

महाविकास आघाडी पुण्याच्या विकासासाठी लढणार आहे. त्यात समविचारी पक्ष आले तर त्यांचे स्वागतच आहे. निवडणुका येतील व जातील. पण प्रदुषणाचे काय? सत्ताधाऱ्यांनी २४ तास पाणी पुरवठा करण्याची ग्वाही दिली होती. पण आज आमच्या बिल्डिंगमध्ये टँकर येतो. अनेक ठिकाणी पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. त्यामुळे ही निवडणूक अत्यंत महत्त्वाची आहे.

मी तूतू, मी मी करत बसणार नाही. पुण्यात चांगला बदल हवा असेल तर सर्वांना एकत्र यावे लागेल. या प्रकरणी दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्यावर चर्चा सुरू आहे, असे सुप्रिया सुळे म्हणाल्या.

## लाव रे तो व्हिडीओ.. आशिष शेलारांचा टोला

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २४ :** मुंबईसह राज्यातील महापालिकांच्या निवडणुकांचे बिगुल वाजताच महाराष्ट्राच्या राजकारणात घडामोडींना वेग आला आहे. याच पार्श्वभूमीवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि मनसे यांची अधिकृत युती जाहीर होताच भाजपाकडून पहिली, पण अत्यंत खोचक आणि आक्रमक प्रतिक्रिया समोर आली आहे.



ठाकरे बंधूंच्या युतीच्या घोषणेनंतर आशिष शेलार यांनी केलेली पोस्ट चर्चेत आली आहे. या पोस्टमधून शेलार यांनी उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या पूर्वीच्या आणि आजच्या भूमिकेचा विसंगतीपूर्ण हिशेब मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

शेलार यांनी पोस्टमध्ये लिहिलं आहे की, मातोश्रीवरील विठ्ठलाला बडव्यांनी घेरलं होतं.. पक्षाचा ताबा चार कारकुनांनी घेतला होता, असं तुम्हीच म्हणत होतात. एवढ्या मोठ्या संघटनेला संपवण्यात भागीदार व्हायचं नाही म्हणून तुम्ही सगळ्या पदांचे राजीनामे देत खुमासदार भाषणं केली होती. आज तेच बडवे आणि तेच कारकून चालणार का? त्यांच्यासोबत भागीदार होणार का?

या पुढे जात शेलार यांनी,आज मुंबईकर ह्यलाव रे तो व्हिडीओ असंच म्हणतील. तुमची जुनी भाषणं काढून आरसा समोर धरतील. चेहरा पाहून भीती वाटणार नाही का? एकत्र येऊन पालिकेची तिजोरी लुटली जाणार नाही ना? गल्लोगल्ली हे प्रश्न विचारले जातील, असा थेट आरोप केला आहे. शेलार यांनी आपल्या पोस्टच्या शेवटी ठाकरे बंधूंना थेट सवाल केला आहे तेव्हा नेमकं कशासाठी वेगळे झाला होतात? आणि आज नेमकं कशासाठी एकमेकांच्या गळ्यात गळे घालताय? या प्रश्नातून भाजपने युतीमागील हेतूंवर संशय व्यक्त करत पालिकेच्या सत्तेभोवतीच फिरणारा राजकारणाचा आरोप अधिक तीव्र केला आहे.

## वायू प्रदूषण रोखण्यासाठी तातडीने पावले उचला

### प्रदूषण नियंत्रण मंडळासह बीएमसीला हायकोर्टाचे आदेश



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २४ :** मुंबई उच्च न्यायालयाने बृहन्मुंबई महानगरपालिका आणि प्रदूषण नियंत्रण मंडळाला फटकारले असून शहरातील वाढते वायू प्रदूषण कमी करण्यासाठी गंभीर पावले उचलण्याचे निर्देश दिले आहेत.

मुख्य न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती गौतम अखंड यांच्या खंडपीठाने म्हटले की, अधिकारी नियमांचे पालन सुनिश्चित करण्यात अयशस्वी ठरले आहेत आणि बीएमसी आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला शहरातील वाढते वायू प्रदूषण कमी करण्यासाठी पावले उचलावे लागतील.

तातडीने आणि प्रभावी पावले उचलली नाहीत. न्यायालयाच्या निर्देशानंतर बीएमसी आयुक्त भूषण गगराणी आणि एमपीसीबीचे सचिव देवेंद्र सिंह खंडपीठासमोर हजर झाले. अधिकारी असण्यासोबतच तुम्हीही नागरिक आहात आणि तुमचे एक मूलभूत कर्तव्य आहे,ह्व असे न्यायालय म्हणाले.

बांधकामे आणि पायाभूत सुविधांचे प्रकल्प तसेच मुंबईत खासगी वाहनांची संख्या प्रचंड वाढली आहे. ज्यामुळे नायट्रोजन डायऑक्साइड आणि कार्बन मोनॉक्साईड यांसारख्या विषारी वायूंचे उत्सर्जन अधिक होते.

## ५ लाखांची लाच घेताना जीएसटी अधिकाऱ्याला अटक

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २४ :** मुंबईच्या सीजीएसटी कार्यालयाचे अधीक्षक एका खाजगी कंपनीच्या संचालकाकडून लाचेची रक्कम स्वीकारताना सीबीआयच्या सापळ्यात अडकले. आरोपी अधिकाऱ्याने एका प्रकरणाचा निकाल तक्रारदाराच्या बाजूने लावण्यासाठी तब्बल १७ लाख रुपयांची मागणी केली होती, ज्यापैकी ५ लाख रुपयांचा पहिला हप्ता घेताना ही कारवाई करण्यात आली.

**घरात सापडली १८ लाखांची रोकड**

२६ नोव्हेंबर रोजी संबंधित अधीक्षकांनी तक्रारदाराच्या कंपनीचे ऑडिट केले होते. यावेळी कंपनीने ९८ लाख रुपयांचा कर बुडवला असल्याची खोटी धमकी आरोपीने दिली होती. हे प्रकरण मिटवण्यासाठी आणि कर दायित्व कमी करण्यासाठी सुरुवातीला २० लाख रुपयांची मागणी करण्यात आली होती. तडजोडीनंतर ही रक्कम १७ लाख रुपयांवर निश्चित झाली. त्यापैकी पहिला हप्ता देण्याचे ठरले होते.

तक्रारदाराने या संदर्भात सीबीआयकडे लेखी तक्रार केली होती. सीबीआयने त्वरित दखल घेत सापळा रचला. ठरल्याप्रमाणे तक्रारदार लाचेचा पहिला भाग म्हणून ५ लाख रुपये घेऊन पोहोचले असता, सीबीआयच्या अधिकाऱ्यांनी संबंधित अधीक्षकांना रंगेहाथ पकडले.

अटकेनंतर सीबीआयने आरोपीच्या मुंबईतील निवासस्थानी धाड टाकली. या झडतीमध्ये अधिकाऱ्यांनी १८ लाख ३० हजार रुपये रोख रक्कम जप्त करण्यात आली, ज्याचा हिशोब आरोपीला देता आला नाही.

एप्रिल २०२५ मध्ये ४०.३० लाख रुपयांची आणि जून २०२४ मध्ये ३२.१० लाख रुपयांची मालमत्ता खरेदी केल्याची कागदपत्रे सापडली आहेत. आरोपीच्या कार्यालयातूनही डिजिटल पुरावे आणि ऑडिट अहवालाशी संबंधित महत्त्वाची कागदपत्रे जप्त करण्यात आली आहेत.

## ठाकरे बंधू मुंबईत १३० जागा जिंकणार

### किशोरी पेडणेकर यांचा दावा

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २४ :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उपनेत्या किशोरी पेडणेकर यांनी मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत ठाकरे गट, मनसेची युती १३० हून अधिक जागा जिंकणार असल्याचा दावा केला. यावेळी त्यांनी आपणही या निवडणुकीच्या मैदानात उतरणार असल्याचे नमूद केले. त्यामुळे किशोरी पेडणेकर या शिवसेना - मनसे युतीच्या पहिल्या उमेदवार ठरू शकतात.

उद्धव व राज ठाकरे यांनी आज आपल्या बहुप्रतिक्षित युतीची घोषणा केली. यावेळी त्यांनी मुंबई किंवा महापालिकेच्या निवडणुकीतील जागावाटपाच्या मुद्यावर कोणतेही भाष्य केले नाही. पण हे जागावाटप दोन्ही पक्षांसाठी सन्मानजनक राहील असा अंदाज व्यक्त केला जात आहे. यावेळी बोलताना मुंबईच्या माजी महापौर तथा ठाकरे गटाच्या उपनेत्या किशोरी पेडणेकर यांनी ठाकरे बंधूंची युती मुंबईत १३० किंवा त्याहून अधिक जागा जिंकेल असा दावा केला.



किशोरी पेडणेकर एका मराठी वृत्तवाहिनीशी बोलताना म्हणाल्या, शिवसेना व मनसेची युती मुंबईत १३० किंवा त्याहून अधिक जागा जिंकेल. मला स्वतःलाही या निवडणुकीत उमेदवारी मिळेल. त्यामुळे मी माज्या वॉर्डातून १०० टक्के निवडणूक लढवेन. भाजपवाले आमच्यावर आरोप करत आहेत. पण त्यांनी आमच्यावर केव्हा आरोप केले नाहीत. ते नेहमीच करतात.

ठाकरे बंधू एकत्र आल्यामुळे त्यांच्या पायाखालची वाळू सरकली आहे. आम्ही काय काम केले हे मुंबईकरांना माहिती आहे. मी स्वतः रणांगणात असेल.

उल्लेखनीय बाब म्हणजे पेडणेकर यांनी २०१७ च्या मुंबई निवडणुकीत दक्षिण मुंबईतील वॉर्ड क्रमांक १९९ मधून निवडणूक लढवली होती. त्यानंतर त्यांची मुंबईच्या महापौरपदी नियुक्ती झाली. आता त्यांनी पुन्हा एकदा आपण निवडणुकीच्या मैदानात उतरणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

## मुंबई महापालिकेचा रणसंग्राम सुरू!

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २४ :** मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक 2025-26 साठी आज, मंगळवार 23 डिसेंबरपासून नामनिर्देशन पत्रे वितरणास जोमाने सुरुवात झाली.

निवडणुकीच्या रिंगणात उतरण्यासाठी इच्छुकांची उत्सुकता पहिल्याच दिवशी दिसून आली असून, मुंबईतील 23 निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयांतून एकूण 4 हजार 165 अर्ज नेण्यात आले आहेत. मात्र, पहिल्या दिवशी एकही अर्ज अधिकृतपणे दाखल झाला नाही.


**पहिल्याच दिवशी ४१६५अर्जांची विक्री**

निवडणूक आयोगाच्या वेळापत्रकानुसार, उमेदवारांना 30 डिसेंबर 2025 पर्यंत अर्ज प्राप्त करून घेता येतील आणि ते सादर करता येतील. 23 ते 29 डिसेंबर या कालावधीत कार्यालयीन वेळेत अर्ज उपलब्ध असतील, तर 30 डिसेंबर रोजी दुपारी 4 वाजेपर्यंतच अर्ज दिले जातील.

अर्ज स्वीकारण्याची वेळ दररोज सकाळी 11 ते दुपारी 5 अशी निश्चित करण्यात आली आहे. मात्र, 25 डिसेंबर रोजी नाताळची सार्वजनिक सुट्टी आणि 28 डिसेंबर रोजी रविवार असल्याने या दोन दिवशी अर्ज वितरण किंवा स्वीकारण्याची प्रक्रिया पूर्णपणे बंद राहणार आहे.

उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत संपल्यानंतर 31 डिसेंबर 2025 रोजी सकाळी 11 वाजेपासून अर्जांची छाननी केली जाईल. छाननी प्रक्रिया पूर्ण होताच वैध उमेदवारांची यादी प्रसिद्ध केली जाणार आहे. ज्या उमेदवारांना निवडणुकीच्या रिंगणातून माघार घ्यायची आहे, त्यांच्यासाठी 2 जानेवारी 2026 रोजी दुपारी 3 वाजेपर्यंतची वेळ देण्यात आली आहे. त्यानंतर, 3 जानेवारी रोजी उमेदवारांना चिन्हांचे वाटप करून अंतिम उमेदवारांची यादी जाहीर केली जाईल.

मुंबई महापालिकेच्या या प्रतिष्ठेच्या लढाईसाठी 15 जानेवारी 2026 रोजी सकाळी 7.30 ते सायंकाळी 5.30 या वेळेत मतदान पार पडणार आहे. मतदानानंतर दुस?याच दिवशी, म्हणजेच 16 जानेवारी रोजी सकाळी 10 वाजेपासून मतमोजणीला सुरुवात होऊन निकाल घोषित केले जातील. निवडणूक प्रक्रिया पारदर्शक आणि नियमानुसार पार पाडण्यासाठी प्रशासनाने प्रत्येक कार्यालयात आवश्यक तांत्रिक सुविधा आणि मनुष्यबळ तैनात केले आहे. उमेदवारांनी अर्ज भरताना कोणतीही त्रुटी राहणार नाही याची काळजी घ्यावी, अन्यथा अर्ज बाद होऊ शकतो, असा इशाराही देण्यात आला आहे.




'पुणेरी पाटी'ची चर्चा

## आर्थिक मदत करणार असाल तरच बेल वाजवा..

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. २४ :** पुणे महानगरपालिकेच्या निवडणुकीची रणधुमाळी अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपली आहे. इच्छुकांसह मतदारांमध्येही कमालीची उत्सुकता आहे.

पुण्यात 'पुणेरी पाट्या' हा केवळ विनोदाचा विषय नसून ते एक प्रभावी संवाद माध्यम आहे, याची प्रचिती पुन्हा एकदा आली आहे. कर्वेनगरमधील एका घरमालकाने आपल्या घराबाहेर लावलेल्या पाटीची सध्या सोशल मीडियावर आणि राजकीय वतुर्ळात जोरदार चर्चा सुरू असून, या पाटीने निवडणूक लढवू इच्छिणाऱ्यांची चांगलीच गोची केली आहे.

पुणे महानगरपालिकेची निवडणूक जाहीर झाल्यापासून 'भावी नगरसेवकां'ची मांदियाळी पाहायला मिळत आहे. मतदारांना आकर्षित करण्यासाठी कोणी देवदर्शन, कोणी महिलांसाठी 'होम मिनिस्टर', तर कोणी सहलींचे आयोजन करत आहे. मात्र, कर्वेनगरमधील या पाटीने थेट आर्थिक मदतीची विचारणा करून, नेत्यांच्या 'प्रलोभन' संस्कृतीवर उपरोधिक टीका केल्याचे बोलले जात आहे.

ही पाटी म्हणजे राजकीय पक्षांच्या दिखाऊ रणनीतीला पुणेरी शैलीत दाखवलेला आरसा असल्याची चर्चा मतदारांमध्ये रंगली आहे.

## माजी उपमहापौर बोडारे भाजपात

### उबाठाला मोठा धक्का

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २४ :** उल्हासनगरच्या राजकारणात मोठी उलथापालथ घडली असून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाला मोठा धक्का बसला आहे.

उल्हासनगर नगरपालिकेचे माजी उपमहापौर व माजी सभागृह नेते यांनी बुधवारी भारतीय जनता पार्टीमध्ये जाहीर प्रवेश केला. मुंबईतील भाजप प्रदेश कार्यालयात झालेल्या कार्यक्रमात भाजप प्रदेशाध्यक्ष यांनी धनंजय बोडारे व त्यांच्या सहकाऱ्यांचे स्वागत केले. यावेळी ओमी कलानी गटाचे माजी नगरसेवक यांनीही भाजपमध्ये प्रवेश केला. यावेळी प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी बोंडारे यांचे स्वागत केले.

## रंगीत पणत्यांनी साकारली भारतमातेची भव्य मोझॅक कलाकृती

### जागतिक विक्रमाची नोंद : भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाणांच्या डोंबिवलीकर परिवाराचे आयोजन

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २४ :** डोंबिवलीत २.५ लाख रंगेबिरंगी पणत्यांमधून साकारलेली भारतमातेची एक अफलातून मोझॅक चित्रनिर्मिती सध्या अतिशय लक्षवेधक ठरत आहे. रंगीत पणत्यांच्या माध्यमातून आकारलेल्या चित्राने जागतिक विक्रम प्रस्थापित केला असून भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या डोंबिवलीकर एक सांस्कृतिक परिवाराच्या माध्यमातून ही अभिनव कलाकृती तयार करण्यात आली आहे. ही रेकॉर्ड ब्रेक कलाकृती पाहण्यासाठी हजारोंच्या संख्येने रसिक प्रेक्षक डोंबिवली जिमखाना मैदानावर गर्दी करत आहेत.



भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण डोंबिवलीसारख्या मराठी साहित्य, संस्कृती आणि कलेचं माहेरघर असलेल्या शहराचं प्रतिनिधित्व करतात. या अनोख्या उपक्रमाविषयी माहिती देताना ते म्हणले की भारतमातेचे पूजन हे संस्कार बालपणातून झालेले असल्याने आणि त्या भारतमातेचे गुणगान गाणारे व वंदन करणारे राष्ट्रगान म्हणजेच वंदे मातरम. अशा श्रद्धा व आस्थेच्या वंदे मातरम या गीताला १५० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल डोंबिवलीत जागतिक विक्रम करण्याचा डोंबिवलीकर एक सांस्कृतिक परिवाराने निर्णय घेतला. चेतन राऊत तसेच प्रभू कापसे व वैभव कापसे या पितापुत्रांच्या जोडीने आणि अन्य कलाकार-साथीदारांनी मिळून सतत नऊ दिवस खपून पणत्या रंगवून कलात्मकतेचा अविष्कार सादर केल्याचे गौरवोद्गार प्रदेशाध्यक्ष चव्हाण यांनी काढले.

ते पुढे म्हणाले की भारतमाता आपल्यासाठी देवी स्वरूप आहे म्हणून तिचं सनातन संस्कृतीत आपण पूजन करतो. आपण सर्वजण त्याच धरतीची लेकरं आहोत आणि या मातीतूनच तयार केलेल्या पणत्यांनी मोझॅक साकारण्याची कल्पना सुचली आणि भारतमातेला, वंदे मातरम गीताला अनोखी मानवंदना देण्याचे ठरले. ९५ फूट उंची आणि ७५ फूट रुंदीची, सुमारे अडीच लाखांहून अधिक रंगीत पणत्यांचा (दिव्यांचा) वापर करून साकारलेली भारतमातेची अद्भुत मोझॅक कलाकृती निर्माण करण्यात आली. या उपक्रमाच्या माध्यमातून वर्ल्ड रेकॉर्ड्स इंडिया अंतर्गत एक नवा जागतिक विक्रम यशस्वीपणे प्रस्थापित झालेला आहे.

ही भव्य कलाकृती कलाकार चेतन राऊत, वैभव प्रभू कापसे तसेच डोंबिवलीकर आर्टिस्ट टीम यांनी अवघ्या नऊ दिवसांत साकारली. डोंबिवली जिमखानातर्फे उत्सव या नावाने वार्षिक मेळा आयोजित केला जातो. तिथे ही कलाकृती २८ डिसेंबर २०२५ पर्यंत खुली ठेवण्यात आली असून प्रेक्षकांनी त्याचा लाभ घ्यावा असे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी आवाहन केले.

## प्रचार संपल्यानंतर सर्व प्रसारमाध्यमांतील निवडणूक जाहिरातींवर बंदी

### १३ जानेवारी सायं. ५.३० नंतर कोणतीही जाहिरात प्रसिद्ध करता येणार नाही

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २४ :** महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्य निवडणूक आयोगाने महत्त्वाचे निर्देश दिले आहेत. जाहीर प्रचाराची मुदत १३ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता संपल्यानंतर इलेक्ट्रॉनिक, मुद्रित तसेच अन्य कोणत्याही प्रसारमाध्यमांतून निवडणूकविषयक जाहिराती प्रसिद्ध किंवा प्रसारित करता येणार नाहीत, अशी स्पष्ट माहिती यांनी दिली.

राज्य निवडणूक आयोगाकडील नोंदणीकृत व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची महानगरपालिका निवडणुकांच्या अनुषंगाने आयोजित बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस आयोगाचे सचिव यांच्यासह विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

राज्य निवडणूक आयुक्त वाघमारे यांनी सांगितले की, १५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान होणार आहे. संबंधित कायद्यानुसार मतदान समाप्तीच्या ४८ तास आधी, म्हणजेच १३ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता जाहीर प्रचाराची मुदत संपेल. त्यानंतर कोणत्याही प्रकारच्या जाहिरातींना माध्यमांतून परवानगी राहणार नाही. यामुळे प्रचार संपल्यानंतर मुद्रित माध्यमांतील जाहिरातींसाठी पूर्वप्रमाणन किंवा विशेष परवानगीचा प्रश्न उद्भवत नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. यासंदभार्तील सविस्तर तरतुदी राज्य निवडणूक आयोगाच्या ९ ऑक्टोबर २०२५ रोजीच्या ह्यनिवडणुकांच्या प्रयोजनार्थ प्रसारमाध्यम संनियंत्रण व जाहिरात प्रमाणन आदेश, २०२५ मध्ये नमूद असल्याचेही त्यांनी सांगितले.

**नामनिर्देशनाबाबत महत्त्वाच्या सूचना**

यावेळी सचिव सुरेश काकाणी यांनी निवडणूक प्रक्रियेबाबत सविस्तर सादरीकरण केले. त्यांनी स्पष्ट केले की, इच्छूक उमेदवाराचे नाव संबंधित महानगरपालिकेच्या मतदार यादीत असणे आवश्यक आहे. मात्र सूचक व अनुमोदकाचे नाव उमेदवार ज्या प्रभागातून निवडणूक लढवत आहे, त्याच प्रभागातील असणे बंधनकारक आहे.

## सुशासनासाठी जलद, पारदर्शक व गुणवत्तापूर्ण सेवा आवश्यक - उपजिल्हाधिकारी महेश परंडेकर

**अकोला :** जलद, पारदर्शक व गुणवत्तापूर्ण सेवेतून सुशासन साकार होते. त्यामुळे केवळ उपक्रमापुरतेच नव्हे, तर संपूर्ण वर्षभर नागरिकांना वेळेत व दर्जेदार सेवा देऊन सुशासन निर्माण करण्याची जबाबदारी सर्वांनी पार पाडावी, असे प्रतिपादन निवडणूक उपजिल्हाधिकारी महेश परंडेकर यांनी आज येथे केले. सुशासन आठवड्यानिमित्त कार्यशाळा नियोजनभवनात झाली, त्यावेळी ते बोलत होते. भूमी अभिलेख अधिक्षक भारती खंडेलवाल, जिल्हा माहितीविज्ञान अधिकारी अनिल चिंचोले यांच्यासह विविध यंत्रणांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

उपजिल्हाधिकारी श्री. परंडेकर म्हणाले की, केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांसंदर्भात नागरिकांना माहिती व्हावी या उद्देशाने 'प्रशासन गावाच्या दिशेने' हे ब्रीदवाक्य घेऊन जिल्ह्यात सुशासन सप्ताह राबविण्यात येत आहे. हे लक्षात घेऊन कामे पारदर्शक व जलदरीतीने व्हावीत. प्रत्येक विभागाने आपले सरकार, सीपी ग्राम पोर्टल व पीजी पोर्टलवर आलेल्या नागरिकांच्या तक्रारीचे निवारण तत्काळ करण्याचे आवाहन श्री. परंडेकर यांनी केले. सुशासन सप्ताहामध्ये 'प्रशासन गावाच्या दिशेने' उपक्रमाच्या माध्यमातून विविध योजनांचे लाभ शिबिरांच्या माध्यमातून नागरिकांपर्यंत पोहचवले जात आहेत. सुशासन सप्ताहाला सर्व स्तरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून वर्षभर नागरिकांच्या तक्रारीचे निरसन जलद गतीने करण्याचे आवाहन कार्यशाळेत करण्यात आले. श्रीमती खंडेलवाल यांनी विभागाच्या गुड गव्हर्नन्स उपक्रमाबाबत सादरीकरण केले.

# अकोला महानगरपालिका म्हणजे भाजपची 'कौटुंबिक मत्तेदारी'?

**■ अकोला, दि. २४ (प्रतिनिधी) : अकोला महानगरपालिकेत भारतीय जनता पक्षाचा कारभार म्हणजे विकास नव्हे, तर 'आपण सर्व मिळून मिसळून खाऊ' या सूत्रावर चालणारी कौटुंबिक ठेकेदारी असल्याचा संतापजनक आरोप नागरिक, कार्यकर्ते आणि परंपरागत मतदार उघडपणे करत आहेत. गेल्या २५–३० वर्षांपासून महानगरपालिकेत तेच ते चेहरे, तीच ती कुटुंबे आणि तोच तो ठेकेदारीचा सुळसुळाट सुरू असून, भाजप नेतृत्वाने याकडे जाणीवपूर्वक डोळेझाक केल्याचा आरोप होत आहे.**

## तेच चेहरे, तेच परिवार, तेच ठेके – परंपरागत मतदारांची उघड फसवणूक



भाजपकडून नगरसेवक पदाची तिकिटे ही जणू घरगुती मालमत्ता बनली आहेत. एका निवडणुकीत नवरा, पुढच्या निवडणुकीत बायको; कधी आई, कधी मुलगा, तर कधी भाऊ यांच्याशिवाय इतर कोणालाच संधी दिली जात नसल्याचे चित्र आहे. बायको नगरसेवक झाली की नवरा ठेकेदार, नवरा नगरसेवक झाला की भाऊ ठेकेदार असा उघडपणे सत्ता-पैसा-ठेके यांचा खेळ सुरू असल्याचा आरोप आहे.अनेक प्रभागांत भाजपचे परंपरागत मत ५० ते ६० टक्क्यांहून अधिक असतानाही, या प्रभागांत नवीन नेतृत्व जन्मालाच येऊ दिले जात नाही. कारण 'आपला प्रभाग भाजपचा आहे, आपण निवडून येणारच' या माजावर हे उमेदवार ना प्रचार करतात, ना मतदारांच्या दारात जातात, ना त्यांच्या समस्या ऐकतात. मतदार केवळ 'कमळावर मतदान करणारी यंत्रणा' म्हणून वापरले जात असल्याचा आरोप आहे.

निवडून आल्यानंतर हे नगरसेवक लोकप्रतिनिधी न राहता थेट त्या प्रभागाचे मालक बनतात. समस्या घेऊन फोन केला तर काम करण्याऐवजी मतदारांना सुनावले जाते, अपमान केला जातो आणि पुढे मतदार फोनच करायला घाबरतो, अशी भीषण स्थिती अनेक प्रभागांत आहे. पाणी, रस्ते, नाल्या, आरोग्य, स्वच्छता यांसारख्या मूलभूत प्रश्नांकडे या नगरसेवकांना काहीही देणेघेणे नसल्याचा आरोप जनतेतून होत आहे.धक्कादायक बाब म्हणजे काही नगरसेवक लोकसभेत काँग्रेसला, विधानसभेत दुसऱ्या पक्षाला मदत करतात आणि महानगरपालिकेत भाजपच्या तिकीटावर निवडणूक लढवतात. कार्यकर्ते वेगवेगळ्या निवडणुकांत वेगवेगळ्या पक्षांसाठी काम करतात; पण महानगरपालिकेत मात्र भाजपच्या तिकीटावर ठेके, कमिशन आणि सत्ता उपभोगतात, असा आरोप केला जात आहे. ठेक्यांमध्ये २० ते २५ टक्के कमिशनची उघड लूट होत असल्याचेही बोलले जात आहे.या सगळ्या प्रकारात भाजपाचे परंपरागत मतदार मात्र प्रामाणिकपणे लोकसभा, विधानसभा आणि महानगरपालिका निवडणुकांत भाजपलाच मतदान करतात. त्या विश्वासाचाच गैरफायदा घेत अकोल्यात लायकी नसलेले, जनतेशी नाड न जोडलेले वागणारे आणि काम न करणारे लोक वर्षानुवर्षे नगरसेवक बनत असल्याचा संताप व्यक्त होत आहे.विशेष म्हणजे भाजपाचे आमदार रणधीर सावरकर आणि खासदार संजय धोत्रे (तसेच खासदार अनुभव धोत्रे) हे लोकांच्या समस्या तात्काळ सोडवतात, कार्यालये चालवतात, कर्मचारी ठेवतात आणि कामांचा पाठपुरावा करतात. मात्र, याच नेत्यांच्या नावावर महानगरपालिकेत मात्र जनतेला मूर्ख बनवण्याचा कारभार राजरोसपणे सुरू असल्याचा आरोप आहे. या पार्श्वभूमीवर भाजपच्या वरिष्ठ नेतृत्वाने तात्काळ हस्तक्षेप करून कौटुंबिक नगरसेवक, ठेकेदारी टोळ्या आणि निष्क्रिय प्रतिनिधींना बाहेरचा रस्ता दाखवावा, अशी जोरदार मागणी होत आहे. एका घरातून दोन-तीन वेळा नगरसेवक झालेल्यांना पुन्हा तिकीट देऊ नये, नवीन चेहरे, नवीन विचार आणि काम करण्याची उमेद असलेले लोक पुढे आणावेत, अन्यथा अकोल्यातील परंपरागत मतदारांचा उद्रेक अटळ आहे, असा थेट इशारा दिला जात आहे.

# भाजपाने केला नवनिर्वाचित नगराध्यक्षांचा सत्कार



## नवनिर्वाचित नगराध्यक्ष विकास सामाजिक दायित्व व जबाबदारी यशस्वीपणे पार पाडतील- आ. सावरकर

**■ अकोला, दि. २४ (प्रतिनिधी) :**
जनतेचा विश्वास आणि कार्यकर्त्यांची ताकद यांच्या बळावर भारतीय जनता पक्षाचा परिवार मोठा होत असून भारतीय जनता पक्षामध्ये विविध सामाजिक क्षेत्रामध्ये काम करणारे राजकीय क्षेत्रातील कार्यकर्ते यांचा प्रवेश होत आहे ही भारतीय जनता पक्षासाठी आनंदाची बाब असून त्यांच्या कर्तुत्वाचा भारतीय जनता पक्ष लाभ घेईल व विकास आणि सामाजिक दायित्व म्हणून जबाबदारी यशस्वी करेल असा विश्वास भाजपा प्रदेश सरचिटणीस आमदार रणधीर सावरकर यांनी व्यक्त केला.

भारतीय जनता पार्टी कार्यालयात उबाठा सेना चे माजी नगरसेवक शरद तुरकर यांनी आपल्या असंख्य कार्यकर्त्यांसोबत भाजपात प्रवेश केला तसेच काँग्रेसचे सक्रिय कार्यकर्ता विलास काळे प्रभाग पाच मधील त्यांनी आपल्या समर्थकासह भारतीय जनता पक्षामध्ये प्रवेश केला त्यावेळी ते बोलत होते कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी जयंत मसने हे होते तर यावेळी मंचावर विजय अग्रवाल, संतोष शिवरकर, माधव मानकर, अंबादास उमाळे संजय गोटफोडे, रमेश अल्करी, एडवोकेट देवाशिष काकड, विवेक भरणे नितीन राऊत संदीप गावंडे, अरुण शर्मा आदी विराजमान होते.

यावेळी विलास काळे, पत्रकार युवराज कदम, सुवास काळे भूषण काळे राम काळे पूर्वेस सावरकर मोहन भटकर पियुष सावरकर प्रणव काळे गोपाल वक्ते संजय मगर सागर पाटील गणेश टाले बंडू पाटील विशाल मगर आदी उपस्थित होते.

## संक्षिप्त

### जानकीबाई डिजिटल स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन

**अकोला :** बाल विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना उजाळा देण्यासाठी अनेक नव उपक्रम राबविणाऱ्या जानकीबाई डिजिटल स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन व क्रीडा महोत्सव मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यात जेसीईडी स्कूल व ना.मा. चौधरी शाळेच्या संघात स्पर्धा घेण्यात आल्यात. कबड्डी, डाचबॉल व अन्य खेळात जेसीईडी स्कूलच्या विद्यार्थ्यांनी बाजी मारीत प्रथम पारितोषिक पटकावले. महोत्सवात द्वितीय दिनी शालेय विद्यार्थ्यांच्या स्कीपिंग, रनिंग, खो-खो, कबड्डी, बॅडमिंटन, क्रिकेट, रस्सीखेच, डॉजबॉल, संगीत खुर्ची व अन्य खेळांच्या स्पर्धा संपन्न झाल्यात.तृतीय दिनी रांगोळी व मेहंदी स्पर्धा घेण्यातआल्यात. यात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेत उत्तम रांगोळी व मेंहदी साकार केली. चतुर्थदिनी वेशभूषा व गीत गायनस्पर्धा घेण्यातआल्यात. यात विद्यार्थ्यांनी वेगवेगळया प्रांताच्या राष्ट्रीय वेशभूषा साकार करून जल्लोष निर्माण केला. पंचम दिनी विज्ञान प्रदर्शनी व नृत्याचा जल्लोष साजरा करण्यात आला.

### आचारसंहिता शस्त्र वापरावर निर्बंध

**अकोला :** अकोला महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने आचारसंहिता पालिकेच्या संपूर्ण क्षेत्रात लागू असून, या कालावधीत शस्त्र वापरावर निर्बंध घालण्यात आले आहेत. जिल्हा दंडाधिकारी वर्षा मीना यांनी याबाबतचा आदेश जारी केला. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ नुसार महापालिका सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाल्यापासून ते निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत महापालिकेच्या संपूर्ण क्षेत्रातील शस्त्र परवानाधारकाला शस्त्र वाहून नेण्यास प्रतिबंधित करण्यात आले आहे. बँक, खेळाडू, सुरक्षारक्षक (खनिकर्म विभाग, बँक, कॅश व्हॅन) पीक संरक्षणार्थ आदींना वगळण्यात आले आहे.

# अकोला विमान पायलट प्रशिक्षण केंद्राला मंजुरी; खा. अनुप धोत्रे यांना यश

**■ अकोला, दि. २४ (प्रतिनिधी) :**
विमान पायलट प्रशिक्षण केंद्राला मंजुरी मिळून देण्यात खासदार अनुप धोत्रे यांना यश मिळाले आहे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच केंद्रीय मंत्री मी यार तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानून खासदार धोत्रे यांनी अकोले करांची शैक्षणिक ओळख पंजाबराव कृषी विद्यापीठ तसेच शिवाजी इंजिनीयर कॉलेजकॉलेज सहा शैक्षणिक हब यामुळे अकोल्याच्या नावाला नावलौकिक मिळाले या पायलट प्रशिक्षक केंद्रामुळे अकोल्याला विकासाला चालना मिळेल असा विश्वास त्यांनी व्यक्त करून अकोले करांना नववर्षाची भेट पंतप्रधान नरेंद्र मोदी दिली आहे.



त्याबद्दल त्यांनी कोटी कोटी धन्यवाद दिले आहे सातत्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्र सरकार राज्य सरकार भारतीय जनता पक्षाच्या प्रतीक लोकप्रतिनिधींच्या पाठीशी उभे असल्याचा हा प्रत्यय असून अकोले करांसाठी ही सुवर्णसंधी असून येत्या चार महिन्यात हे केंद्र सुरू होणार असून यासाठी केंद्र सरकारने संस्थेला मंजुरी दिली असून त्या मंजुरीच काम होऊन लवकरच अकोल्यात ही सुविधा उपलब्ध झाल्यामुळे विदर्भाच्या पश्चिम विदर्भाच्या युवकांना शैक्षणिक दर्जा उंचावून अकोल्यातील विद्यार्थ्यांना मुंबई चेन्नई जाण्याची गरज भासणार नाही आणि अकोल्याचा विकासाला चालना मिळेल असा विश्वास त्यांनी करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भूमीअधिकरणाचं काम सुरू केलं असून जिल्हाधिकारी वर्षाताई मीना यांची यासंदर्भात नियुक्ती करण्यात आली असून आणि त्यासाठी निधी उपलब्ध करून देऊन सरकारने अकोल्यातील हवाई पट्टी सोबत विमान सेवा सुरू करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे सुद्धा आभार व्यक्त करून यासाठी आपल्याला मदत करणारे आमदार रणधीर सावरकर तसेच जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींचे त्यांनी आभार व्यक्त केले आहे

# स्व डँडी देशमुख स्मृती 'लघु चित्रपट महोत्सवात' अनेक दर्जेदार लघु चित्रपटांची नोंदणी

### आठव्या लघुचित्रपट महोत्सवाचे स्व प्रमिलाताई ओके सभागृह, अकोला येथे शानदार आयोजन

**■ अकोला, दि. २४ (प्रतिनिधी) :**
अकोला : स्व डँडी देशमुख स्मृती लघुचित्रपट महोत्सव समितीच्या वतीने ८ व्या लघुचित्रपट महोत्सवाचे आयोजन शुक्रवार,दि २७ डिसेंबर २०२५ रोजी, प्रमिलाताई ओक सभागृह, अकोला येथे करण्यात आले असुन सदर महोत्सवात अनेक राष्ट्रीय लघु-चित्रपट निर्मात्यांच्या लघुचित्रपटांची मेजवानी अकोलेकर रसीकांना लाभणार असल्याची माहीती आयोजन समितीचे सर्वश्री प्रकाश बिरकड, प्रशांत देशमुख, चित्रपट निर्माते शत्रुघ्न बिरकड,प्रा सदाशिव शेळके, डॉ राजेश देशमुख,प्रा मधुभाऊ जाधव, संजय शर्मा, पंकज देशमुख,कृष्णा कांबळे,कुणाल देशमुख, निलेश जळमकर,मिरसाहब आदींनी आयोजीत पत्रकार परिषदेत दिली.माजी आमदार स्व प्रा तुकारामभाऊ बिडकर यांचे मार्गदर्शनात ८ वर्षांपूर्वी सुरु झालेला हा लघु चित्रपट महोत्सव सातासमुद्रपार प्रसिद्ध



झाला असुन स्व बिडकरांच्या जीवनावर सुद्धा एक लघुचित्रपट प्रसंगी प्रदर्शित करण्यात येईल हे विशेष उल्लेखनीय.विदर्भाच्या कलाक्षेत्रात अष्टपैलु कर्तुत्व गाजवीणारे विदर्भ चित्रपट पंढरीचे चित्रपटमहर्षी स्व डँडी देशमुख ह्यांचे स्मृतीप्रित्यर्थ लघुचित्रपट महोत्सवाचे उद्घाटन दि २७ डिसेंबर २०२५ रोजी दु ४ वाजता माजी आ गजाननराव दाळू गुरुजी अकोला ह्यांचे अध्यक्षतेखाली तर खा अनुप धोत्रे यांचे हस्ते संपन्न होईल, प्रसंगी सुप्रसिद्ध लेखिका मनीषा कोरडे यांची विशेष उपस्थिती राहील.यात आयोजकांच्या वतीने चित्रपट सृष्टीतील उत्कृष्ट व चौफेर कामगिरी बद्दल जेष्ठ कलावंत सतीश पिंपळे यांना जीवन गौरव पुरस्कार प्रदान केला जाईल तसेच फिल्म दिग्दर्शक शेखर रणखांबे व युवा दिग्दर्शक साहिल इंगळे यांचाही यथोचित सत्कार केला आयोजन समितीतर्फे केला जाईल.लघुचित्रपट महोत्सवाच्या दुसऱ्या टप्प्यात राष्ट्रीय स्तरावर प्राप्त झालेल्या विविध भाषेतील ११०० लघुचित्रपटापैकी निवडक १५ लघुचित्रपट प्रदर्शित करण्यात येतील.

# विदर्भ चेंबरच्या 'विटेक्स– २०२६' चे भूमिपूजन थाटात

## प्रदर्शनी दि २ जानेवारी पासून होणार प्रारंभ

**■ अकोला, दि. २४ (प्रतिनिधी) :**
अकोला-पश्चिम विदर्भाच्या औद्योगिक आणि व्यापारी विश्वाला गतिमान करण्याच्या उद्देशाने विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीच्या वतीने दि २ ते ५ जानेवारी पर्यंत गोरक्षण रोड वरील गोरक्षण संस्थेच्या मैदानात आयोजित 'विटेक्स –२०२६'चे भूमिपूजन रविवारी मोठ्या उत्साहात संपन्न झाले.पं. सुदर्शन शर्मा यांच्या मार्गदर्शनात संपन्न या भूमिपूजन सोहळ्यात विदर्भ चेंबरचे अध्यक्ष व प्रदर्शनीचे संयोजक निकेश गुप्ता व सौ. रुचि गुप्ता यांनी पूजा-अर्चना करून वैदिक मंत्रोच्चारात भूमिपूजन केले.कार्यक्रमात चेंबरचे सचिव नीरव वोरा, वरिष्ठ उपाध्यक्ष सिद्धार्थ रूहाटिया, कनिष्ठ उपाध्यक्ष निखिल अग्रवाल, कोषाध्यक्ष किशोर बाछूका, सहसचिव किरीट मंत्री ,सह संयोजक राहुल मित्तल व प्रदर्शनीचे मुख्य प्रायोजक मार्वेल ट्रिनिटी रिअल इस्टेट एलएलपी चे मधुर सुनील इनान्नी, जितेश संतोष हेड़ा,सह-प्रायोजक विठ्ठल ब्रँडचे शिवप्रकाश रूहाटिया समवेत चेंबरचे माजी



अध्यक्ष श्रीकिशन अग्रवाल, अशोक डालमिया, अशोक गुप्ता व रमाकांत खंडेलवाल प्रमुख उपस्थित होते.यावेळी मान्यवरांनी या आगळ्यावेगळ्या प्रदर्शनी संदर्भात आपले मत व्यक्त केले.ही प्रदर्शनी विदर्भाच्या औद्योगिक व व्यापारी विश्वात एक मैलाचा दगड ठरणार आहे. यामुळे विदर्भाच्या औद्योगिक विकासाला नवी गती मिळणार असून या प्रदर्शनीचा उद्योजक, व्यापारी व नागरीकांनी मोठ्या संख्येने लाभ घेण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.या भूमिपूजन सोहळ्यात प्रदर्शनी आयोजन समितीचे एड. सुभाषसिंह ठाकुर,आशीष अमीन, चंचल भाटी, दिलीप खत्री, दीपाली देशपांडे, गुलशन कृपलानी, हरिश लाखानी, कृष्णा शर्मा, मधुर खंडेलवाल, महेश मूंदड़ा, मनीष केडिया, नमन खंडेलवाल, नीलेश अग्रवाल, पंकज कोठारी, राहुल गोयनका, राजीव शर्मा, राजकुमार राजपाल, सज्जन अग्रवाल, संतोष छाजेड़,केतन गुप्ता,प्रणय कोठारी,रोहित रुंगटा,पीयूष खंडेलवाल, श्रीकांत गोयनका, योगेश अग्रवाल, आशुतोष वर्मा, विजय जानी, रामप्रकाश मिश्रा, ज्ञानप्रकाश खंडेलवाल, प्रवीण खंडेलवाल, हेमेंद्र कोठारी, लक्ष्मीकांत डागा, किशोर मांगटे पाटिल, स्वानंद कोंडालीकर, धर्मेश वैद्य,अभिषेक अग्रवाल,देवांश गुप्ता, गोपाल टेकडीवाल,कपिल ठक्कर, मनोज अग्रवाल, नितिन बियानी, ओम अग्रवाल ऋतिक अग्रवाल, रोहित केडिया,शैलेश आलमचंदानी,भूषण अग्रवाल, निर्मल समदडीया, रोहित खंडेलवाल, यश सिंघानिया,केशव खंडेलवाल, कुंजीलाल सुनारीवाल, गिरिराज लखोटिया, मंगेश रघुवंशी, तुषार नारे, देवांग जैन, प्रताप ठाकुर, सौ. पायल वोरा, सौ. रविता शर्मा, सौ. लिना आर्या, सौ. संध्या कारिया, कृतिका गुप्ता, हर्षिता रघुवंशी तसेच शगुन इव्हेंटचे प्रेम अग्रवाल व रोहन जाटव यांच्यासह अनेक वरिष्ठ सदस्य, उद्योजक, व्यापारी, सामाजिक कार्यकर्ते व गणमान्य नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चाईल्ड इन्फ्लूएन्सर संस्कृती बालहक्कांच्या रक्षणासाठी कायदा कधी?

पालकांकडून मुलांचा सोशल मीडियावर प्रसिद्धी मिळविण्यासाठी वापर होत आहे. राज्यसभेच्या खासदार सुधा मूर्ती यांनी सोशल मीडियाच्या वापराबाबत नियमावली असावी, अशी मागणी राज्यसभेत केली. सोशल मीडियावर काही काळापासून लहान मुलांचा वावर वाढलेला दिसत आहे. विशेष करून पालकच लहान मुलांना चाईल्ड इन्फ्लूएन्सर बनविण्यासाठी उत्सुक असतात.

लहान मुलांच्या निरागसतेचा, त्यांच्या गोंडस दिसण्याचा वापर करून सोशल मीडियावर प्रसिद्धी आणि त्यातून पैसा मिळविण्याचा प्रकार काही जणांकडून होताना दिसतो. या ट्रेंडबद्दल आता थेट राज्यसभेत चिंता व्यक्त करण्यात आली आहे. इंन्फोसिसचे संस्थापक नारायण मूर्ती यांच्या पत्नी आणि खासदार सुधा मूर्ती यांनी राज्यसभेत बोलत असताना हा प्रश्न उचलला. तसेच लहान मुलांचा डिजिटल माध्यमावरील वापर नियंत्रित करण्यासाठी नियमावली तयार करण्याची मागणी केली.

आजचा काळ सोशल मीडियाचा आहे. प्रसिद्धी, लाईक्स, शेअर्स आणि फॉलोअर्स यांच्या मागे संपूर्ण समाज धावत आहे. मात्र या शर्यतीत सर्वाधिक नुकसान होत आहे ते निरागस बालपणाचे. सोशल मीडियावर लहान मुलांचा वाढता वावर ही केवळ डिजिटल क्रांतीची निशाणी नसून ती बालहक्कांवरील गंभीर आघात ठरत आहे.



ॲड. दत्तात्रय फडतरे
पुणे. 7588072685

पूर्वी बालपण म्हणजे खेळ, शाळा, मित्र आणि स्वप्नांची दुनिया होती. आज मात्र अनेक मुलांचे बालपण कॅमेऱ्यासमोर स्क्रिप्टप्रमाणे जगावे लागत आहे. विशेष बाब म्हणजे, या प्रक्रियेत बहुतांश वेळा पालकच पुढाकार घेताना दिसतात. आपल्या मुलांच्या निरागसतेचा वापर करून प्रसिद्धी आणि त्यातून आर्थिक लाभ मिळवण्याचा नवा ट्रेंड उदयास आला आहे. चाईल्ड इन्फ्लूएन्सर या नावाखाली मुलांना प्रत्यक्षात ब्रँड प्रमोशन आणि व्यवसायाचा भाग बनवले जात आहे.

लहान वयात सतत कॅमेऱ्यासमोर राहणे, अपेक्षांचा दबाव, ट्रोलिंग, तुलना आणि टीका... याचे गंभीर मानसिक परिणाम मुलांवर होत आहेत. त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे, मुलांची गोपनीयता कायमची सार्वजनिक केली जात आहे. एकदा इंटरनेटवर गेलेली माहिती पुसणे अशक्य असते. भविष्यात त्या मुलांना त्यांच्या बालपणातील खासगी क्षण विसरण्याचाही अधिकार उरत नाही.

हा प्रकार बालकामगाराच्या छुप्या स्वरूपात मोडतो. ठराविक वेळ, सतत शूटिंग, जाहिरातींसाठी काम, उत्पन्नावर मुलांचा कोणताही अधिकार नसणे, ही परिस्थिती गंभीर आहे.

प्रसिद्धी आणि आर्थिक लाभाच्या मोहात मुलांचा व्यावसायिक वापर होणे हे बालहक्कांचे उल्लंघन आहे. तरीही भारतात आजतागायत चाईल्ड इन्फ्लूएन्सर संदर्भात स्वतंत्र कायदा अस्तित्वात नाही, ही वस्तुस्थिती चिंताजनक आहे.

फ्रान्स, जर्मनी आणि कॅनडासारख्या देशांनी याबाबत ठोस पावले उचलली आहेत. फ्रान्सने तर खास कायदा करून मुलांच्या कमाईचे संरक्षण, कंटेंटवर मर्यादा आणि वयाच्या १८ वर्षांनंतर कंटेंट हटवण्याचा अधिकार दिला आहे. भारत मात्र अजूनही या विषयाकडे दुर्लक्ष करताना दिसतो. संविधानातील बालहक्क, बालकामगार प्रतिबंधक कायदे आणि आयटी कायदे हे या डिजिटल शोषणासाठी अपुरे पडत आहेत.

फॉलोअर्सची संख्या वाढवण्यासाठी बालपणाचा बळी देणे ही सामाजिक विकृती आहे. पालकांचे कर्तव्य मुलांना स्टार बनवणे नसून सुरक्षित, निरोगी आणि आनंदी नागरिक घडवणे हे आहे. मुलं म्हणजे कंटेंट नव्हे; ती भविष्याची पिढी आहेत. त्यांच्या बालपणाचे रक्षण करणे ही केवळ कायदेशीरच नव्हे, तर नैतिक आणि सामाजिक जबाबदारी आहे.

सोशल मीडियाच्या वाढत्या प्रभावामुळे चाईल्ड इन्फ्लूएन्सर संस्कृती वेगाने विस्तारत आहे. प्रसिद्धी आणि आर्थिक लाभाच्या मोहात लहान मुलांचा जाहिराती, ब्रँड प्रमोशन आणि डिजिटल कंटेंटसाठी वापर केला जात असून, यामुळे त्यांचे बालपण, मानसिक आरोग्य आणि गोपनीयता धोक्यात येत आहे.

एकदा इंटरनेटवर शेअर झालेला कंटेंट कायमस्वरूपी राहतो, त्यामुळे मुलांना त्यांच्या खासगी आयुष्यावरचा हक्क गमवावा लागतो. जगातील काही देशांनी या समस्येची दखल घेत स्वतंत्र कायदे लागू केले असताना, भारतात अद्याप स्पष्ट कायदेशीर चौकट नाही.

विद्यमान बालहक्क व आयटी कायदे डिजिटल शोषण रोखण्यासाठी अपुरे ठरत आहेत. शासनाने तातडीने स्वतंत्र कायदा करून पालक, सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्स आणि जाहिरातदार यांची जबाबदारी निश्चित केली पाहिजे. मुलांच्या संरक्षणासाठी स्वतंत्र, कठोर आणि कालसुसंगत कायदा तातडीने लागू करणे ही काळाची गरज आहे.

## पुढाऱ्यांनो, सेवेची कसोटी लावा!




भारतीय राज्यघटनेनुसार, नागरिकांना मिळालेल्या मतदानाच्या हक्काचे महत्त्व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी आपल्या ग्रामगीतेतून कित्येक वर्षांपूर्वीच मांडले. निवडणुकीचे महत्त्व पटवून सांगताना निवडणुकीतील सदोष प्रथांवरही त्यांनी प्रहार केले. निवडणुकीत कुठल्याही आमिषाला बळी पडू नका, असा सल्ला नागरिकांना देतानाच पैशांची नव्हे तर सेवेची कसोटी लावा, असे आवाहन त्यांनी पुढाऱ्यांना केले. राष्ट्रसंतांचे त्या काळचे विचार आजच्या राजकीय व्यवस्थेतील जळमटे दूर करण्यासाठी प्रभावीपणे लागू होतात.

मत हे दुधारी तलवार
उपयोग न केला बरोबर
तरि आपलाचि उलटतो वार
आपणावर शेवटी

निवडणूक प्रक्रियेमध्ये आज विकासकामापेक्षा पैशांनाच अधिक महत्त्व प्राप्त झाल्याची स्थिती आहे. जो उमेदवार अधिक पैसा खर्च करू शकेल, तोच मतदारांपर्यंत प्रभावीपणे पोहचू शकेल. निवडणूक लढविणे हे सर्वसामान्यांचे काम नाही, अशा व्याख्याच जणू आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी करून ठेवल्या आहेत. भ्रष्टाचाराच्या प्रकरणात अडकलेल्या नेत्यांनाही पक्षश्रेष्ठी पाठीशी घालतानाचे चित्र आज पाहायला मिळते. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी ग्रामगीतेत संघटन शक्ती या प्रकरणात निवडणूक प्रक्रियेतील दोषांवर प्रहार करत उमेदवार आणि मतदारांना उपदेश केला.

मतदारांनी कुठल्याही आमिषाला बळी न पडता योग्य नेत्याची निवड करणे यातच राष्ट्राचे हित आहे. त्यामुळे निवडणुका पारदर्शक होणे हेच लोकशाहीचे बळ असल्याचा संदेश राष्ट्रसंतांनी ग्रामगीतेतून दिला आहे. निवडणुकीत घरी न बसता प्रत्येकाने मत देण्याचा सल्लाही राष्ट्रसंतांनी ग्रामगीतेतून दिला.

**राष्ट्रसंतांचा उमेदवारांना संदेश...**

स्वाथार्साठी सेवेचे सोंग करू नका
प्रलोभन देऊन मते मिळवू नका
व्यसनी गुंडांना प्रोत्साहन नको
नेत्यांनो, फुटीर वृत्ती टाळा
मते मिळविण्यासाठी दारूचा वापर नको
आपल्या प्रचारातून जनतेच्या हिताचा आलेख मांडा
प्रचार म्हणजे आरडाओरडा करून गोंधळ घालणे नव्हे
निवडणुकीतील सदोष प्रथांना तिलांजली द्या
पक्षपात न करता गरिबांच्या हक्कासाठी उभे राहा
मतदारांनो...
नाती, गोती, पक्ष, पंथ, जातपात, गरीब-श्रीमंत,
देवघेव या आधारावर मत देऊ नका.
राष्ट्राचे हित तुमच्या एका मतावर अवलंबून आहे.
राजकारणातील दोष बघून निराश होऊ नका,
जाणत्या नेत्यांना निवडा.
चुकीच्या व्यक्तीला मत देणे म्हणजे
आगीत बारुद ओतण्यासारखे आहे.
भ्रष्ट लोकांमधून प्रामाणिक व्यक्तींची निवड करा.

देशाच्या हितासाठी संघटनेचा प्रमुख शुद्धचारित्र्याचा असावा.
जनतेची कामे न करणाऱ्या नेत्यांना जागा दाखवा.
निवडणूक ही भविष्याची अचूक संधी आहे.
जनतेसाठी काम करणारा उमेदवार याच निकषावर आपला नेता निवडा.

--------------------

रुपेश प्रकाशराव वाळके
संत्रा उत्पादक शेतकरी
दापोरी, ता. मोर्शी. जि.अमरावती.
8550958444

■ ■ ■

## रुग्णसेवेसह कामगारांच्या हक्कासाठी उभी केली चळवळ

माणूसपणाची पाऊलवाट
सुजाता बंडावार
mahasagarngp@gmail.com





सतत तीन वर्षे संघर्ष करूनही न मिळालेले उपचार व आर्थिक चणचण यामुळे कॅन्सरग्रस्त वडील नरसप्पा मुतुला यांचे निधन झाले. या घटनेने रुग्णसेवक भिमेश मुतुला यांना अंतर्बाह्य हेलावून सोडले. आपण आपल्या वडिलांचे प्राण तर वाचवू शकलो नाही, पण असे असंख्य लोक आहेत ज्यांना योग्य उपचार व पैशांच्या अभावी प्राण गमवावा लागतो. अशा गोरगरिबांच्या रुग्णसेवेसह कामगारांच्या हक्कासाठी त्यांनी नेव्हीमधील नोकरी सोडून देशभरात रुग्णसेवकांची चळवळ उभी केली.

आपल्या निर्णयाला मोलमजुरी करून वाढविलेल्या आईची साथ मिळवत त्यांनी आगेकूच केली. ही लढाई अभ्यासपूर्ण व्हावी म्हणून त्यांनी वकिलीचा अभ्यास केला. मुंबईमध्ये राहणारे ॲड. भिमेश मुतुला यांनी येथील कामगारांच्या कामाच्या ठिकाणची अनास्था आणि सरकारी दवाखान्यातील आरोग्य सेवेची दुर्दशा पाहिली.

बांधकामे उंच होत आहेत, पण सुरक्षा आणि जबाबदारी तळाला गेली आहे. कामगारांचा जीव धोक्यात घालून होणारा विकास समाजासाठी लाजिरवाणा आहे. नवीन बांधकामे व पुनर्विकास प्रकल्पांमध्ये सुरक्षेचे नियम केवळ कागदावरच आहेत. अपघातानंतरही कामगारांच्या कुटुंबीयांना न्याय आणि नुकसानभरपाई मिळत नाही; त्यांच्या सुरक्षिततेची हमी मिळत नाही.

ही बाब त्यांना प्रकर्षाने जाणवली जेव्हा चेंबूरस्थित ओम साई बिल्डिंगच्या निमार्णाधीन प्रकल्पातील कामगार यादप्पा कवालीचा सुरक्षा साधनांच्या अभावी उंचावरून पडून मृत्यू झाला. यानंतरही बिल्डरकडून कोणतेही मदत्कार्य झाले नाही. या घटनेनंतर ॲड. भिमेश मुतुला यांनी आवाज बुलंद केला आणि जोपर्यंत कामगाराच्या परिवाराला मोबदला मिळत नाही, तोपर्यंत हे निमार्णाधीन कार्य बंद पाडण्यास म्हाडा प्राधिकरण आणि कामगार आयुक्तालयाला भाग पाडले. अखेर त्यांनी त्या कामगाराच्या परिवाराला ११ लाख रुपये मोबदला मिळवून दिला.

त्यांच्या या आक्रमक पवित्र्याने कामगारांमध्ये आनंदाची लाट पसरली. मालाड येथील प्रणदा बायोफार्मा कंपनीमध्ये कोट्यवधी रुपयांचा विनापरवाना व मुदतबाह्य औषधसाठा दवाखान्यांमध्ये विक्रीसाठी जात होता. ही बाब भिमेश मुतुला यांनी उघडकीस आणली आणि अन्न व औषध प्रशासनाने तेथे धडक कारवाई करत हा साठा जप्त केला. यामुळे हजारोंची जीवितहानी टाळण्याचे महत्कार्य त्यांच्याकडून झाले.

सरकार रुग्णांसाठी कसे असंवेदनशील आहे याचे उदाहरण देताना ते मोठ्या पोटतिडकीने म्हणतात, मुंबईच्या टाटा कर्करोग रुग्णालयाबाहेरील पदपथांवर आसरा घेणा?या रुग्णांच्या नातेवाईकांना हटवून तेथे नर्सरी करण्याची मागणी तत्कालीन आमदारांनी केली होती. खरेतर रुग्णांना पदपथावर आसरा घ्यावा लागणे ही दुर्दैवाची गोष्ट आहे, पण अशांचा आसरा काढून घेतला जाणे ही माणुसकीला कालिमा फासणारी गोष्ट आहे. याचा त्यांनी जोरदार निषेध केला आणि त्यांच्या अथक प्रयत्नातून ही मागणी मागे घेण्यात आली.

असे अनेक लोकहितकारी कार्य करत असताना त्यांना लक्षात आले की, सरकारी व खासगी रुग्णालयांमध्ये पुरेशी सुरक्षा प्रणाली नसते. परिणामी, आगी लागून मोठ्या प्रमाणात जीवितहानी होण्याच्या घटना घडत असतात.

अशीच एक घटना त्यांनी सांगितली की, अंधेरी पश्चिमेकडील क्रिटी केअर रुग्णालय प्रशासनाकडून नियमबाह्य बांधकामे करण्यात आली होती. राखीव असलेल्या दोन तळमजल्यांत मोठ्या प्रमाणात डी.सी.पी.आर. कायद्याचे उल्लंघन करत अनेक तपासणी मशीन्स, डायग्नोस्टिक सेंटर, बिलिंग कॅश अकाऊंट विभाग आणि ब्लड बँक नियमबाह्यरीत्या सुरू करण्यात आली होती. याचा त्यांनी प्रखर विरोध केला.

आणखी एक संवेदनशील गोष्ट त्यांनी सांगितली की, ज्योती सिंह नावाची तीन वर्षांची मूकबधिर मुलगी होती, जिला कानाची शस्त्रक्रिया केल्याशिवाय बोलता येणार नव्हते. आई-वडिलांची परिस्थिती नसल्याने त्यांना ही शस्त्रक्रिया झेपत नव्हती. तेव्हा तिच्या शस्त्रक्रियेसाठी लागणारा निधी भिमेश यांनी लोकसहभागातून उभा केला आणि त्या मुलीची यशस्वी शस्त्रक्रिया घडवून आणली. आता या मुलीच्या आरोग्याची सर्व जबाबदारी त्यांनी उचलली आहे.

अंधेरी येथील बंद पडलेल्या कामगार विमा रुग्णालयात ओपीडी सुरू झाली असून आयपीडीसाठीची प्रक्रिया सुरू आहे. अशा प्रकारे हजारो रुग्णांच्या आरोग्यविषयक गरजा पूर्ण करण्यासाठी त्यांनी देशभरात रुग्णसेवकांची चळवळ उभी केली आहे. त्यांच्या कार्याची ऊर्मी बघून नव्या उमेदीचे तरुण पुढे येत आहेत.

याच संघटनेच्या माध्यमातून त्यांनी कोरोना काळात मोफत अन्नसेवा पुरविली, महिलांसाठी गर्भाशयाच्या मुखाच्या कॅन्सरसाठी मोफत लसीची सुविधा उपलब्ध करून दिली आणि आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांसाठी मदतकार्य केले. अशा नानाविध सेवाकार्यातून ते गोरगरिबांचे कैवारी ठरले आहेत.

हे कार्य करत असताना अनेक धमक्या, षड्यंत्र आणि वादांचा सामना त्यांना करावा लागला. पण काम करण्याची तळमळ आणि जोडीला असणारे कायदेविषयक शिक्षण यामुळे ते साऱ्या संकटांशी दोन हात करत आहेत.

ॲड. भिमेश मुतुला आज आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर शून्यातून विश्व साकारत रुग्णसेवक संघटना आणि श्रमिक कामगार संघटनेचे सचिव म्हणून कार्यरत आहेत. रुग्णांच्या चेहऱ्यावरील हास्यामध्ये त्यांना आपले वडील दिसतात आणि त्यांच्या या कार्यामुळे लाखो लोकांचे आशीर्वाद मिळत असल्याने त्यांची आई समाधान व्यक्त करते.

वृत्तपत्राच्या माध्यमातून ॲड. भिमेश मुतुला सांगू इच्छितात की, कामगारांसाठीच्या योजना केवळ कागदोपत्री असून त्यांची अंमलबजावणी शून्य आहे. प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल्स निर्माण व्हायला हवीत, असे सांगत ते मार्गदर्शन करतात की प्रत्येकाने स्वावलंबनाचा अंगीकार करावा. शून्यापासून सुरू केलेली ही चळवळ सदैव यशस्वी पथावर चालत राहो, यासाठी त्यांना मनापासून शुभेच्छा!

-----------

: **ॲड. भिमेश मुतुला संपर्क क्रमांक: ८४२४८४४६९२**

## नेतृत्व, कर्तृत्व, वक्तृत्व यांचा सुरेख संगम अटलबिहारी वाजपेयी



श्याम ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

कवी मनाचे, प्रखर राष्ट्रवादी अशी प्रतिमा असणारे भारताचे माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांची आज जयंती.

२५ डिसेंबर १९२४ रोजी जन्मलेल्या अटलबिहारी वाजपेयी यांनी कानपूरमधून राज्यशास्त्रात एम ए ची पदवी मिळवली. पदवी मिळविल्यानंतर वाजपेयी हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पूर्णवेळ कार्यकर्ते बनले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे काम करताना त्यांनी पत्रकारिताही केली.

राष्ट्रधर्म, पांचजन्य आणि वीर अर्जुन या नियतकालिकांसाठी त्यांनी पत्रकारिता केली. १९४२ च्या भारत छोडो आंदोलनात भाग घेऊन त्यांनी राजकीय कारकीर्द सुरू केली. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी १९५१ साली जनसंघांची स्थापना केली. जनसंघाच्या स्थापनेत श्यामाप्रसाद मूखर्जी इतकाच अटलबिहारी वाजपेयी यांचाही वाटा आहे. १९५७ साली पहिल्यांदा ते जनसंघाच्या तिकिटावर लोकसभेत पोहचले.

आपल्या अभ्यासपूर्ण भाषणांनी त्यांनी लोकसभेत ठसा उमटवला. त्यांचे भाषण ऐकण्यासाठी तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू आवर्जून लोकसभेत उपस्थित राहत. पंडित जवाहरलाल नेहरु अटलजींच्या वक्तृत्वाने मोहित झाले होते. अटलबिहारी वाजपेयी एकदिवस भारताचे पंतप्रधान बनतील असे भविष्य त्यांनी वर्तवले होते. अटलबिहारी वाजपेयी सलग ९ वेळा लोकसभेवर निवडून गेले होते.

१९६८ साली ते जनसंघाचे अध्यक्ष बनले. पक्षाध्यक्ष या नात्याने जनसंघ घरोघरी पोहचवण्याचे काम त्यांनी केले. त्याचवेळी विरोधी पक्षाची भूमिकाही त्यांनी तितक्याच प्रभावीपणे बजावली. १९७५ साली पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी देशात आणीबाणी लागू केली. या आणीबाणीला त्यांनी प्रखर विरोध केला. आणीबाणीला विरोध केला म्हणून त्यांना दोन वर्षाचा कारावास भोगावा लागला.

आणीबाणी उठल्यानंतर इंदिरा गांधी यांना पदावरुन हटवण्यासाठी सर्व विरोधी पक्ष एकत्र येऊन त्यांनी जनता पार्टी नावाचा पक्ष स्थापन केला. अटलबिहारी वाजपेयी यांनीही आपला जनसंघ हा पक्ष जनता पार्टीमध्ये विलीन केला. पण अवघ्या तीन वर्षात १९८० साली त्यांनी मुंबईत भारतीय जनता पार्टीची घोषणा केली. मोरारजी देसाई यांच्या मंत्रिमंडळात अटलजी परराष्ट्रमंत्री होते. परराष्ट्रमंत्री या नात्याने त्यांनी इतर देशांशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. १९९६ साली ते पहिल्यांदा पंतप्रधान बनले पण लोकसभेत बहुमत सिद्ध न करता आल्याने अवघ्या तेरा दिवसांतच त्यांचे सरकार पडले. त्यानंतर १९९८ साली ते पुन्हा पंतप्रधान बनले यावेळी मात्र त्यांचे सरकार तेरा महिने टिकले. पण या तेरा महिन्यात त्यांनी अनेक महत्वाचे निर्णय घेतले.

अमेरिकेच्या दबावाला बळी न पडता त्यांनी अणुस्फोट करून आपले सामाजिक व वैज्ञानिक श्रेष्ठत्व सिद्ध केले. ते पंतप्रधान असतानाच भारताने कारगिल युद्ध जिंकले होते. जय जवान, जय किसान, जय विज्ञान ही घोषणा त्यांनी दिली. १९९९ साली तिसऱ्यांदा ते पंतप्रधान बनले. यावेळी मात्र त्यांचे सरकार पाच वर्ष टिकले. सलग पाच वर्ष पंतप्रधान राहिलेले ते पहिले बिगर काँग्रेसी पंतप्रधान होते.

अटलबिहारी वाजपेयी हे उत्कृष्ट कवी होते त्यांच्या सर्व कविता लोकप्रिय झाल्या त्यातील आओ फिरसे दिया जलाये.... ही कविता लोकांना खूप आवडली. त्यांनी सुमारे ४० पुस्तकांचे लेखन केले. त्यांना अनेक पुरस्कार मिळाले. उत्कृष्ट संसदपटूचा पुरस्कार त्यांना अनेकवेळा मिळाला. सरकारने त्यांना पद्मविभूषण हा मानाचा पुरस्कार देऊन गौरविले.

भारतरत्न हा देशाचा सर्वोच्च पुरस्कार त्यांना मरणोत्तर प्रदान करण्यात आला. नेतृत्व, कर्तृत्व आणि वक्तृत्व यांचा सुरेख संगम असलेल्या अटलबिहारी वाजपेयी यांचे १६ ऑगस्ट २०१८ रोजी निधन झाले. अटलबिहारी वाजपेयी यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!

■ ■ ■

## स्त्री सन्मान की राजकीय लाभ?

वाचक लिहितात

सामाजिक माध्यमांवर प्रसारित झालेल्या एका व्हिडिओमध्ये बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार पाटलीपुत्र येथे नवनियुक्त आयुष डॉक्टरांना नियुक्तीपत्रे देत असताना युनानी वैद्य डॉ. नुसरत परवीन यांच्या हिजाबला हात लावत असल्याचे दिसले.

या घटनेनंतर विरोधी पक्षांपासून ते सामाजिक माध्यमांपर्यंत अनेकांनी मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्यावर तीव्र टीका केली. काही वृत्तपत्रांमध्ये डॉ. नुसरत परवीन यांच्या भावनिक प्रतिक्रियांची आणि त्यांनी बिहारमध्ये नोकरी करण्यास नकार दिल्याच्या बातम्यांचीही चर्चा झाली. भारतीय संस्कृती स्त्रियांचा आदर करण्याची शिकवण देते; त्यामुळे नितीश कुमार यांच्या या कृत्याचे समर्थन होऊच शकत नाही. नितीश कुमार यांची हिजाब ओढण्याची कृती अत्यंत चुकीचीच आहे यात तिळमात्रही शंका नाही.

मात्र, यापूर्वीही अशा कितीतरी घटना घडल्या आहेत; ज्यात स्त्रीच्या सन्मानाला ठेस पोहचली आहे. तेव्हा मात्र विरोधी पक्षांनी समान तीव्रतेने प्रतिक्रिया दिली नाही, हेही तितकेच खरे.

२०१४ मध्ये झारखंड येथील राष्ट्रीय नेमबाज तारा सहदेव यांच्याशी रणजित कुमार कोहली या खोट्या नावाने रकीबुल हसन या मुसलमानाने हिंदु पद्धतीने विवाह केला. विवाहानंतर काही दिवसांनी तो मुसलमान असल्याचे तारा सहदेव यांच्या लक्षात आल्यावर त्या न्यायालयात गेल्या. तब्बल ९ वर्षे तारा सहदेव यांनी न्यायालयीन लढा दिला.त्या वेळीही अनेक राजकीय पक्षांनी मौन धारण केले होते.

वरील सर्व घटनांमधून स्त्री सन्मानाची व्याख्या केवळ राजकीय लाभानुसार ठरत असते हे अगदी स्पष्टपणे लक्षात येते आणि तो राजकीय लाभ कोणता हे वेगळ्याने सांगण्याची आवश्यकता नाही. हा प्रश्न केवळ हिजाबचा नव्हे तर त्यातून मुसलमानांचे लांगूलचालन होताना दिसत असल्यामुळे स्त्री सन्मानाची संकुचित व्याख्या करणाऱ्यांचा बहिष्कार करायला हवा.

■ रेणुका हरदास
नागपूर.

■ ■ ■

(कालच्या अंकावरून पुढे)

--------------------

## भारतातील शेतकरी जीवनातील सामाजिक संकट

डॉ. राजेंद्र बगाटे
९९६०१०३५८२
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

शेतकरी आत्महत्यांच्या आकड्यांमागील सामाजिक प्रतिमांचा अभ्यास करताना असे दिसून येते की आर्थिक धोरणे, बाजार व्यवस्था, शासकीय योजना, कृषी विमा, न्यूनतम समर्थन मूल्य आणि तज्ज्ञ मार्गदर्शन यांचा प्रत्यक्ष परिणाम जमिनीवर कसा लागू होतो, हेही महत्त्वाचे आहे.

अनेक वेळा योजनांचे प्रत्यक्ष कार्यान्वयन, पारदर्शकता, वैयक्तिक व सामाजिक मतभेद, स्थानिक प्रशासनाची कार्यक्षमता यांचे मिश्रित परिणाम शेतकऱ्यांच्या जीवनात दिसतात. कृषी विमा योजना प्रत्यक्षात उपयोगी पडत नाहीत किंवा तितक्या परिणामकारकपणे लागू होत नाहीत, टरढ चा लाभशून्य होतो, कर्ज परतफेडीची वेळ व व्याज यांचा दबाव वाढतो, आणि उत्पादन खचार्चा भार अधिकच वाढतो. यामुळे शेतकऱ्यांच्या जीवनातील अनिश्चितता आणि तणाव हे वाढते आणि सामाजिक प्रतिष्ठा व आत्म-आदर यांच्यात विरोधाभास निर्माण होतो, ज्याचा मानसिक स्वास्थ्यावर गंभीर परिणाम होतो.

राष्ट्रीय शेतकरी दिन हा दिवस आमच्या समाजाला एक चिंतनात्मक व व्यापक दृष्टीकोनातून शेतकऱ्यांचे जीवन, आर्थिक तणाव, सामाजिक प्रतिष्ठा आणि मानसिक स्वास्थ्य यांच्यातील जटिल नाते समजून घेण्याची संधी देतो. हा दिवस आपल्याला स्मरण करून देतो की शेतकरी समुदाय केवळ अन्नाचे उत्पादक नाही, तर सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि मानसिक दृष्टिकोनातून आपला समाज टिकविणारा पाया आहे.

त्यांच्या समस्यांचे निराकरण फक्त आर्थिक उपाययोजना किंवा कृषी सुधारणा पुरते मर्यादित नसून, सामाजिक सुरक्षा, मानसिक आरोग्य सेवा, शिक्षण व प्रशिक्षण, पायाभूत सुविधा, आर्थिक समावेशन, सामाजिक सहभाग व पिकांच्या बाजारभावाचे संरक्षण यांचा एक समग्र दृष्टिकोन आवश्यक आहे. ग्रामीण भागातील सामाजिक नेटवर्क, समुदाय आधारित सहयोग, आरोग्य व मनोवैज्ञानिक समर्थन, कुटुंबीय सल्ला, समुपदेशन, महिला सक्षमीकरण आणि सामाजिक न्याय हे सर्व घटक एकत्रितपणे शेतकऱ्यांना सकारात्मक भवितव्याकडे मार्गदर्शन करू शकतात.

शेवटी, राष्ट्रीय शेतकरी दिन हा दिवस आपल्या सामाजिक धारणा व मूल्यांना नव्याने परिभाषित करण्याची, शेतकऱ्यांना सन्मान, सुरक्षा, प्रतिष्ठा आणि गरिमापूर्ण जीवनमान देण्याची एक सामाजिक व नैतिक जबाबदारी आहे.

शेतकरी संकट हे फक्त कृषीशी निगडीत समस्या नाही, तर सामाजिक-मानसिक-आर्थिक समग्र समस्या आहे, आणि त्याचे निराकरण करण्यासाठी शासन, समाज, शैक्षणिक संस्था, स्वयंसेवी संस्था आणि सरसकट नागरिकांनी एकत्र येऊन व्यापक सामाजिक व धोरणात्मक उपाययोजना आखणे आवश्यक आहे. राष्ट्रीय शेतकरी दिन आपल्याला हे स्मरण करून देतो की शेतकऱ्यांचे जीवन, त्यांचे ध्येय आणि त्यांच्या संघर्षाचे सामाजिक परिणाम हे आपल्या सर्वांचे कल्याण आणि प्रगती यांना जोडलेले आहेत.

■ ■ ■

## पुरेसे व्हिटॅमिन डी मिळण्यासाठी आहारात करा यांचा समावेश




व्हिटॅमिन डी सर्वोत्तम स्त्रोतः व्हिटॅमिन डी हे एक पोषक तत्व आहे जे आपली हाडे, स्नायू, प्रतिकारशक्ती आणि मनःस्थिती संतुलित करते. जर त्याची कमतरता असेल तर थकवा, वेदना, झोपेचा त्रास, केस गळणे, प्रतिकारशक्ती कमकुवत होणे आणि हाडे देखील दीर्घकाळापर्यंत कमकुवत होऊ शकतात.

अभ्यासानुसार, शहरात राहणारे सुमारे ८०% लोक त्याच्या कमतरतेशी झगडत आहेत, जे लोक दिवसभर उन्हात राहतात ते देखील याचा पूर्ण फायदा घेऊ शकत नाहीत आणि दैनंदिन आहारात त्याचे प्रमाण जवळजवळ नगण्य आहे. अशा परिस्थितीत, प्रश्न उद्भवतो की आपण दररोज १००% व्हिटॅमिन डी मिळवू शकता, यासाठी सूर्यप्रकाश पुरेसा आहे की त्यास अन्न-पूरक आहाराची देखील आवश्यकता आहे.

जर तुमच्या शरीरात व्हिटॅमिन डी खूप कमी असेल किंवा तुम्ही सूर्य, नॉन-व्हेज घेत नसाल तर सप्लीमेंट्स हा सर्वोत्तम पर्याय आहे. पूरक आहारांचे दोन प्रकार आहेत. डी २ (वनस्पती स्त्रोत) आणि डी ३ (प्राणी स्त्रोत) बहुतेक डॉक्टर व्हिटॅमिन डी ३ घेण्याची शिफारस करतात, कारण ते जलद कार्य करते. त्याच्या सामान्य डोसबद्दल बोलायचे झाले तर दररोज १५००-२०० आययू घ्यावेत, परंतु योग्य डोस चाचणीनंतरच कळतो. कार्यालयीन कर्मचारी, वृद्ध, घरी राहणा?या महिला आणि गडद त्वचा असलेल्या लोकांसाठी हा डोस आवश्यक आहे, ज्यांची चाचणी २० नॅनोग्राम प्रति मिलीलीटरपेक्षा कमी आहे.

व्हिटॅमिन डीला सनशाईन व्हिटॅमिन म्हणतात. सूर्यप्रकाश आपल्या त्वचेला थेट व्हिटॅमिन डी तयार करण्यास मदत करतो. तज्ज्ञांच्या मते, १० ते ३० मिनिटे उन्हात घालवली पाहिजेत. सकाळी १० च्या आधी किंवा संध्याकाळी ४ नंतर सूर्यप्रकाश चांगला आहे. सनस्क्रीन, जॅकेट किंवा कॅप लावल्याने व्हिटॅमिन डी कमी होते.

जर तुम्ही नॉन-व्हेज खात असाल तर फॅटी फिश आणि सीफूड तुमच्यासाठी सर्वोत्तम असू शकते. बहुतेक व्हिटॅमिन डी सॅल्मन, ट्यूना, मॅकेरल, सार्डिन आणि कोळंबी यासारख्या माशांमध्ये आढळते. फक्त १०० ग्रॅम सॅल्मनमध्ये ५०० आययूपेक्षा जास्त व्हिटॅमिन डी असते. चरबीयुक्त मासे आणि सीफूड व्हिटॅमिन डीच्या सर्वोत्तम नैसर्गिक स्त्रोतांपैकी एक आहेत. सॅल्मनचा ३-औंस डोस जास्तीत जास्त १०० ग्रॅम पर्यंत फायदा देऊ शकतो.

आठवड्यातून ४ वेळा ७०-८० ग्रॅम मशरूम खाल्ल्याने व्हिटॅमिन डीची चांगली मात्रा मिळते. जर आपण अंडी खाल्ली तर दररोज १-२ अंडी अंड्यातील पिवळ बलक देखील भरपूर व्हिटॅमिन डी प्रदान करते. एका अंड्यामध्ये व्हिटॅमिन डीचे सुमारे ४०-४५ आययू असते. याशिवाय जगभरातील अनेक पदार्थांमध्ये व्हिटॅमिन डी जोडला जातो. फोर्टिफाइड दूध, सोया-बदाम-ओट दूध, दही, संत्राचा रस, न्याहारी तृणधान्ये आणि टोफू यांचा समावेश आहे. ■ ■ ■

### अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



## अटल - पर्व

चिखलात राहूनही -
नाही कां कमळ फुलते?
वर्तमान स्थिती पाहता
'अटलजी ' खरचं
'राजकीय संत ' होते ..!

अवाजवी घोषणांचा वर्षाव
सत्तेसाठी चाटूगिरी
निम्नस्तर भाषा वापराची
केली नाही कधी दादागिरी ..

राष्ट्रहीत फर्स्ट ला प्राधान्य
भ्रष्टाचार खाबुगिरी
फुकटवाटपाचा
स्वार्थासाठी केला नाही
अंगीकार . .!

विरोधक का असेना आदराने
नतमस्तक होत असे त्यांच्यापुढे
आज शोधा बरे असे किती
आहेत आदर्श नेते
देशात गडे?..!

## महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक : ६ कार्यालयामार्फत ४६५ नामनिर्देशन पत्रांचे सशुल्क वितरण

**अकोला :** अकोला महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ अंतर्गत निवडणूक निवडणूक निर्णय अधिकारी झोन क्रं. १ अंतर्गत एकुण ३८ उमेदवारांना ६२ नामनिर्देशन पत्र, निवडणूक निवडणूक निर्णय अधिकारी झोन क्रं. २ अंतर्गत एकुण ३६ उमेदवारांना ५६ नामनिर्देशन पत्र, निवडणूक निवडणूक निर्णय अधिकारी झोन क्रं. ३ अंतर्गत एकुण ६२ उमेदवारांना १३५ नामनिर्देशन पत्र, निवडणूक निवडणूक निर्णय अधिकारी झोन क्रं. ४ अंतर्गत एकुण ५० उमेदवारांना ९६ नामनिर्देशन पत्र, निवडणूक निवडणूक निर्णय अधिकारी झोन क्रं. ५ अंतर्गत एकुण ३५ उमेदवारांना ५९ नामनिर्देशन पत्र आणि निवडणूक निवडणूक निर्णय अधिकारी झोन क्रं. ६ अंतर्गत एकुण ३४ उमेदवारांना ५७ नामनिर्देशन पत्र असे ६ झोन मधून एकुण २५५ उमेदवारांनी ४६५ उमेदवारांना सशुल्क नामनिर्देशन पत्र वितरीत करण्यात आले आहे. आज दि. २४ डिसेंबर २०२५ रोजी ६ निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय येथे एकही नामनिर्देशन पत्र दाखल झालेला नाही.

# खडकीत भाजप-काँग्रेसला खिंडार

## लंगोटे, घोगरे, ढोरे, अडगावकर समवेत शेकडो कार्यकर्त्यांचा शिवसेना उबाठा मध्ये जाहीर पक्षप्रवेश

■ **अकोला, दि. २४ (प्रतिनिधी) :** आगामी मनपा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजप -काँग्रेसचा पारंपरिक गड मानल्या जाणारा खडकी परिसर नुकताच शिवसेना उबाठामय झाला असून सर्वत्र भगव्या ध्वजानी खडकी परिसर भगवामय झाला. काल परिसरातील दिग्गज युवा नेत्यांनी भाजप, काँग्रेस व अन्य पक्षांना जाहीर फारकत देऊन सेनेची मशाल हातात घेतली आहे. यामुळे मनपा निवडणुकीत खडकी परिसरात शिवसेना उबाठाची ताकद अधिक मजबूत होत असल्याचे स्पष्ट चित्र दिसत आहे.



रविवारी खडकी येथील बिरकड लॉन येथे भव्य पक्षप्रवेश सोहळा संपन्न झाला. शिवसेना उभाटाचे जिल्हाध्यक्ष आ नितीन देशमुख यांच्या अध्यक्षतेत संपन्न या कार्यक्रमात ग्रामीण जिल्हाध्यक्ष गोपालराव दातकर, प्रा. डॉ संतोष हुसे, उपजिल्हाप्रमुख मुकेश मुरूमकर, सुरेंद्र विसपुते, अतुल पवनीकर, महानगराध्यक्ष आशिष गावंडे, माजी नगरसेवक मंगेश काळे, अभय खुमकर, केशवराव पातोंड, विनायकराव, शंकरराव लंगोटे, राजेश घोगरे, दिलीप मेंगे आदी उपस्थित होते. भव्य आतिशबाजी व मशाल पेटून मान्यवरांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. मान्यवरांनी छत्रपती शिवाजी महाराज, स्व बाळासाहेब ठाकरे यांचे प्रतिमा पूजन करून जाहीर पक्षप्रवेश सोहळ्यास प्रारंभ केला. यावेळी परिसरातील भाजपचे युवा कार्यकर्ते राजेश घोगरे, ज्येष्ठ नेते शंकरराव लंगोटे, माजी ग्रामपंचायत सदस्य वर्षाताई घोगरे, मंजुळाताई लंगोटे, माजी नगरसेवक सोमनाथ आडगावकर, गजानन खांबलकर, शंकरराव बिरकड, विनायक कारजकर, दिलीप मेंगे, शरद पवार, माजी उपसरपंच निलेश जयस्वाल, माजी सरपंच रवी पाटील लुले पुरुषोत्तम लुले, गजानन भारसाकळे अविनाश पातोंड सिद्धेश्वर लंगोटे हुंडीवाले, दत्ताभाऊ मोरे अनिल मुंडे, राजू नायसे, दिनेश अग्रवाल, विठ्ठल एरोकार, अनुप सरोदे, प्रफुल राठोड, रामेश्वर चव्हाण, प्रकाश दळवी दळवी, अनिल चोपडे, संतोष जायले, सुरेश ठाकरे, समवेत शेकडो महिला पुरुषांनी मान्यवर नेते मंडळींच्या उपस्थितीत जाहीर पक्षप्रवेश घेत आपापल्या पक्षाला सोडचिठ्ठी देत राजकीय सेवेची नवी मुहूर्तमेढ या माध्यमातून रोवली. या पक्ष प्रवेश सोहळ्यात खडकी बु., जि.प. कॉलनी, संतोष नगर, धाबेकर नगर, म्हाडा कॉलनी, बंजारा नगर, जिल्हा परिषद कॉलनी, अष्टविनायक कॉलनी, शिवापुर परिसरातील शेकडो युवक व महिला कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला. आ नितीन देशमुख यांनी प्रक्ष प्रवेश करणाऱ्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे भगवे शेले ओढून जल्लोषात स्वागत केले. मतदार भाजप महायुतीच्या दळभद्री व भ्रष्टाचारी कारभाराला पुरते कंटाळले असून या पक्षप्रवेशा मुळे खडकी परिसरातून शिवसेना उबाठाचे शिलेदार प्रचंड मताधिक्याने निवडून येणार असल्याची आशा यावेळी व्यक्त केली. यावेळी अनेक मान्यवरांनी ही आपले विचार व्यक्त करीत भाजप महायुतीच्या भ्रष्टाचारी कारभाराच्या विरोधात शिवसेना उबाठाच्या उमेदवारांना निवडून आणण्याचे आवाहन केले. संचालन गजाननराव हरणे यांनी तर आभार माजी नगरसेवक मंगेश काळे यांनी मानलेत. यावेळी पंचक्रोशीतील हजारो कार्यकर्ते महिला पुरुष नागरिक उपस्थित होते.

## अकोला गार्डन क्लबच्या पुष्प प्रदर्शनी मध्ये सागर प्रधान यांनी पटकावली चॅम्पियन ट्रॉफी.



■ **प्रतिनिधी | अकोला** ■ मागील दोन दिवसापासून अकोला शहरात सुरू असलेलं अकोला गार्डन क्लब व महाबीज द्वारे आयोजित पुष्प प्रदर्शनी चा आज समारोप झाला. २१ तारखेला प्रदर्शन बघण्याकरिता अकोलेकरांनी प्रचंड गर्दी केली होती. अकोला गार्डन क्लब द्वारे आयोजित पुष्पप्रदर्शनी मध्ये अकोला शहरातील पुष्पप्रेमी व वृक्षप्रेमी नागरिकांनी सहभाग नोंदविला होता. १२०० प्रतियोगी यंदाच्या स्पर्धेत सहभागी झाले होते. समारोपिय कार्यक्रमानंतर महाबीज चे संचालक डॉक्टर रणजीत सपकाळ, प्रसिद्ध व्यावसायिक नितीन खंडेलवाल, उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन पाटील, पोलीस अधिकारी मनोज केदारे व अकोला गार्डन क्लबच्या संस्थापक सदस्यांपैकी वसंत बाबू खंडेलवाल, प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचं संचलन प्राध्यापक वैशाली पाटील यांनी केलं.

एकूण ५२ विविध श्रेणीमध्ये बक्षीस दिल्या गेली. त्यापैकी प्रथम पारितोषिक (चॅम्पियन ट्रॉफी) सागर प्रधान यांनी मिळवली, तर महाबीज द्वितीय तर तिसरे बक्षीस अनुराधा ढवळे यांना मिळालं. अतिशय प्रतिष्ठेचा समजल्या जाणार किंग ऑफ रोज हा पुरस्कार अनुराधा ढवळे यांनी पटकाविला., क्वीन ऑफ रोज हा पुरस्कार ज्योती कमलेश कोठारी यांनी मिळवला तर प्रिन्स ऑफ रोज रामेश्वर लाड यांनी मिळवला तर प्रिन्सेस ऑफ रोज हा पुरस्कार पुन्हा अनुराधा ढवळे यांनी पटकविला.

प्रियांका पडगिलवार, राजेश लोहिया, ज्योती कमलेश कोठारी, व शारदा डोंगरे यांना सुद्धा बहुसंख्य बक्षीस प्राप्त झाली. याशिवाय इतरही अनेकांनी बक्षीस मिळवली. तर संस्थात्मक गार्डन या श्रेणीमध्ये प्रथम पारितोषिक प्रभात किड्स या शाळेने मिळवलं.

समारोपीय कार्यक्रमाला अकोला गार्डन क्लबचे विद्यमान अध्यक्ष संजय शर्मा, , सुवर्ण महोत्सवी वर्ष अध्यक्ष अजय सेंगर , जयप्रकाश पाटील, उपाध्यक्ष सुधीर राठी, शरद कोकाटे, सचिव श्याम गोटफोडे ,वैशाली पाटील, विजय ढवळे, सुनील कवीश्वर, नरेश अग्रवाल, व दिनेश पारेख यांच्यासह गार्डन क्लबचे इतरही पदाधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचं प्रास्ताविक संजय शर्मा यांनी केलं. यावेळी संस्थेचे पदाधिकारी संजय हेडा, विजय शहा, निशिकांत बडगे, श्रीकांत कोंडुलीकर, आलोक खंडेलवाल, नरेश अग्रवाल, , संतोष अग्रवाल, संजय श्रावगी, संदीप महल्ले, सुधीर रांदड, कुशल सेनाड, रवी खंडेलवाल , गजानन मालोकार, सागर प्रधान, श्याम गोटफोडे , नीरज आवंडेकर, संजय आगाशे, भूषण ताजने , तर महिला पदाधिकाऱ्यांमध्ये पल्लवी दिवेकर, अर्चना सापधरे, कोकिळा पाटील, अनुराधा ढवळे, शारदा बियाणी, हीना शहा , अमिता सायानी आदींनी परिश्रम घेतले. शहरातील गणमान्य व्यक्तींसह इतरही नागरिकांनी शेवटच्या दिवशी प्रदर्शनी बघण्याकरिता प्रचंड गर्दी केली होती.

## वातावरण नियंत्रण उपकरणाच्या पेटंटला मंजुरी



■ **अकोला, दि. २४ (प्रतिनिधी) :** कृषी विद्यापीठा अंतर्गत संरक्षित शेतीत वातावरण नियंत्रणाच्या दिशेने एक महत्त्वाची प्रगती झाली आहे. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला येथील कृषी अभियांत्रिकी अंतर्गत कृषी स्थापत्य अभियांत्रिकी विभागामार्फत तयार वातावरण नियंत्रण उपकरणासाठी नव्या तंत्रज्ञानाला पेटंट मंजूर झाले आहे. या उपकरणामुळे हवेतील वायू, सूर्यप्रकाश आर्द्रता, प्रकाशाची तीव्रता यावर प्रभावी नियंत्रण ठेवता येणार आहे. हे उपकरण स्मार्ट सेन्सर प्रणाली आणि स्वयंचलित नियंत्रण तंत्रज्ञानावर आधारित असून संरक्षित शेतीमध्ये वापरण्यास उपयुक्त ठरणार आहे. यामुळे संरक्षित शेतीमध्ये पिकांना योग्य पोषक वातावरण निर्मिती होऊन पिकांची चांगली वाढ व गुणवत्ता सुधारण्यास तसेच पर्यावरणीय संतुलन राखण्यास मदत होईल. वातावरण नियंत्रण उपकरण पेटंटची नोंदणी झाल्याबद्दल कुलगुरू डॉ. शरद गडाख यांनी कृषी अभियांत्रिकी अधिष्ठाता डॉ.सुरेंद्र काळबांडे, कृषी स्थापत्य अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. सुचिता गुप्ता, डॉ. राजेश मुरूमकर डॉ. भाग्यश्री पाटील डॉ. मृदुलता देशमुख, प्रा. अजय तळोकार यांचे अभिनंदन केले आहे. संबंधित संशोधकांनी सांगितले की, हे तंत्रज्ञान कमी खर्चिक, आणि दीर्घकालीन वापरासाठी उपयुक्त आहे. या शोधाला घ्र्हींह ड्रींहू ध्मि कडून पेटंट संरक्षण मिळाल्याने 'मेक इन इंडिया' आणि हरित तंत्रज्ञान क्षेत्राला चालना मिळणार आहे.

एकूणच, हे पेटंट पर्यावरण संरक्षणासाठी एक सकारात्मक आणि भविष्यातील उपयोगी पाऊल मानले जात आहे. यापूर्वी विद्यापीठातील कृषी अभियांत्रिकी अंतर्गत सौर प्रकाश कीटक सापळा, बहुउद्देशीय फेरो लाईट आणि फेरोसिटी लाईट कीटक सापळा, सौर उर्जेवर चालणारे प्राणी प्रतिबंधक यंत्र, कृषी अवशेषांपासून उच्च मूल्याचे बायोचार करण्याचे यंत्र, बायोमास डिस्टिलेशन प्रणाली, सौर उर्जेवर चालणारे खत पसरविणारे यंत्र, सिताफळ गर विलगीकरण यंत्र इत्यादी सात पेटंटची नोंदणी होऊन हे आठव्या क्रमांकाचे पेटंट आहे. कृषी अभियांत्रिकी अंतर्गत विकसित यंत्रे व उपकरणे यांच्यामार्फत विद्यापीठाला रॉयल्टी मिळत असल्याचे कृषी अभियांत्रिकी अधिष्ठाता डॉ. सुरेंद्र काळबांडे यांनी सांगितले.

## भ्रातृमंडळ अकोला चे वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न



■ **अकोला, दि. २४ (प्रतिनिधी) :** भ्रातृमंडळ, प्रभा लेआऊट, रणपिसे नगर, अकोला या सामाजिक संस्थेचे वार्षिक स्नेहसंमेलन तथा सांस्कृतिक कार्यक्रम रविवार दिनांक २१.१२.२५ रोजी खंडेलवाल भवन अकोला येथे अत्यंत आनंदात संपन्न झाला. उद्घाटनप्रसंगी महाराष्ट्र दैवत छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल आणि कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. पाहुणे श्री भास्कर चांगो पाटील यांचा सत्कार करण्यात आला. परंपरेनुसार जेष्ठ नागरिकांचे सपत्नीक सत्कार करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे अकोला पूर्व चे मा. आमदार श्री रणधीर भाऊ सावरकर यांचे स्वागत मंडळाध्यक्ष डॉ. श्री एम एन पाटील यांनी केले, तसेच प्रमुख पाहुणे भाजप महानगरअध्यक्ष आणि माजी मनपा सभापती, लोकप्रिय नेते श्री जयंत भाऊ मसने यांचे स्वागत मंडळ उपाध्यक्ष प्रा. श्री राजीव इंगळे यांनी केले. सामाजिक बांधिलकी आणि बंधुभाव जपण्यासाठी स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात येत असते. सांस्कृतिक कार्यक्रमाद्वारे लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांनीच आनंद लुटला. सर्व मंडळ पदाधिकारी, सदस्यगण आणि महिलामंडळाच्या अथक परिश्रमाने पार पडलेल्या कार्यक्रमास निमंत्रित परिवारांची लक्षणीय उपस्थिती होती. सादरकर्त्यांना बक्षीसे देण्यात आली.

### नावात बदल

मि **शिवराज नंदकिशोर खंडाळकर** पासपोर्ट साठी अर्ज केला आहे. परंतु माझ्या T.C. व मार्कशिटवर **शिवराज नंदु खंडाळकर** असे नाव आहे. तसेच ADHAR CARD आणि PAN CARD वर **शिवराज नंदकिशोर खंडाळकर** असे नाव आहे. सदरहू दोन्हीही नावाचा व्यक्ती एकच आहे, अशी मी हमी देतो.
दि. २३/१२/२०२५
**शिवराज नंदकिशोर खंडाळकर**
मो. ९०२८२३३०७७

### Change In Name

I Have Change My Name
OLD NAME
**PARESHKUMAR RAVINDRAKUMAR GOENKA**
NEW NAME
**PARESH RAVINDRAKUMAR GOENKA**
My Residential Address is :- Besides Bhala Dalmill, Kholeshwar Road, Citykotwali, Dist. Akola 444001.

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या पुण्यतीथी महोत्सवात अनेक कार्यक्रमाची राहणार रेलचेल

### शनिवारी निघणार भव्य शोभायात्रा



■ **अकोला, दि. २४ (प्रतिनिधी) :** गत सतरा वर्षापासून महानगरात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या विचाराचा जागर करीत वैचारिक प्रबोधन करणाऱ्या अ. भा.श्री गुरुदेव सेवा मंडळ अंतर्गत वं.राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज सेवा समितीच्या वतीने राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांच्या ५७ व्या पुण्यतिथी पुण्यस्मरण सोहळ्यात अनेक प्रबोधनात्मक कार्यक्रमाची रेलचेल राहणार असून या महोत्सवाची तयारी पूर्ण झाली असल्याची माहिती वंदनीय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज सेवा समितीचे अध्यक्ष शिवाजी म्हैसने, कार्याध्यक्ष एड संतोष भोरे, स्वागताध्यक्ष अन्नपूर्णेश पाटील यांनी बुधवारी आयोजित पत्रकार परिषदेत दिली. यावेळी समितीचे त्र्यंबकराव आखरे, शेख गुरुजी, डॉ गजानन काकड, गंगाधर पाटील, सहदेवराव खांबलकर, रवींद्र ढोरे, दिलीप कराळे, श्रीकृष्ण सावडे ,सुरेश राऊत, गजानन जालनकर, चंद्रशेखर चतारे, बंडूभाऊ शेळके, डॉ गोवर्धन खवले आदी उपस्थित होते. महोत्सवाचा प्रारंभ शनिवार दि २७ डिसेंबर रोजी सिव्हिल लाईन परिसरातील जि.प. कर्मचारी भवनात होत असून हा महोत्सव रविवार दि २८ डिसेंबर पर्यंत राहणार आहे. शनिवार दिनांक २७ डिसेंबर रोजी सकाळी ६ वाजता गायत्री परिवाराचे डॉ. अजय उपाध्याय यांच्या सामूहिक ध्यान व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमा पूजनाने होणार आहे. या नंतर सकाळी ९ वाजता राजराजेश्वर मंदिर येथून ग्रंथराज ग्रामगीता व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमा पालकीची भव्य शोभायात्रा निघणार आहे. ही शोभायात्रा सिटी कोतवाली, गांधी रोड, धिंग्रा चौक, मोठे पोस्ट ऑफिस, सीताबाई कॉलेज मार्गे सिव्हिल लाईन परिसरातील जि. प. कर्मचारी भवनात येऊन येथे या शोभायात्रेचे समापन होणार आहे. दु १२ वाजता महोत्सवाचा उद्घाटन सोहळा होणार असून यात उद्घाटक म्हणून अ. भा.श्री गुरुदेव सेवा मंडळ गुरुकुंज मोझरीचे प्रचार प्रमुख प्रकाश महाराज वाघ राहणार आहेत. तर स्वागताध्यक्ष म्हणून अन्नपूर्णेश पाटील ,सत्र अध्यक्ष डॉ गजानन नारे राहणार आहेत. या सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून खा.अनुप धोत्रे, आ.रणधीर सावरकर, आ नितीन देशमुख, आ वसंत खंडेलवाल, आ हरीश पिंपळे, आ साजिद खान पठाण, माजी मंत्री गुलाबराव गावंडे, माजी मंत्री रणजित पाटील, माजी आ. बबनराव चौधरी, माजी जि प अध्यक्ष बालमुकुंद भिरड, बाजार समितीचे सभापती शिरीष धोत्रे, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष अध्यक्ष संग्राम गावंडे, कृष्ण अंधारे, जयंत मसने, प्रकाश मानकर, माधवराव भुईभार, प्रा डॉ संतोष हुशे, चित्रलेखा म्हैसने, डॉ परमेश्वर जुणारे, जगदीश भुतडा, शुकदास गाडेकर, गुरुदेव सेवाश्रम नांदुऱ्याचे आचार्य हरिभाऊ वेरुळकर, सप्त खंजेरी वादक सत्यपाल महाराज, गुरुदेव सेवा मंडळाचे सरचिटणीस जनार्धन बोथे, गुलाबराव महाराज आदीना निमंत्रित करण्यात आले आहे.

## एसटीमध्ये बनावट ओळखपत्रांवर प्रवास करणाऱ्यांवर प्रवाश्यावर आता होणार कठोर कारवाई

■ **अकोला, दि. २४ (प्रतिनिधी) :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (श्ऐंऊ) बसेसमध्ये काही प्रवासी बनावट ओळखपत्रे (Fake IDs) दाखवून सवलतीच्या दरात प्रवास करत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.

या गंभीर प्रकाराची दखल घेत, अकोला विभागाने सर्व वाहकांना (कंडक्टर) सवलतीचे तिकीट देताना प्रवाशांचे ओळखपत्र काटेकोरपणे तपासण्याचे निर्देश दिले आहेत.

सुधीरसिंह राठोड, रा. शेकापूर, ता. पातूर, जि. अकोला यांनी 'आपले सरकार' पोर्टलवर (तक्रार क्र. DV/HoMT/MSRTC2025/402, दि. ०५/१२/२०२५) तक्रार दाखल केली होती. रा.प. बसेसमध्ये बनावट ओळखपत्रे दाखवून प्रवासी प्रवास करत असल्याचे तसेच सवलतधारक प्रवाशांच्या ओळखपत्र तपासणीबाबत त्यांनी तक्रार केली होती. या तक्रारीच्या अनुषंगाने, अकोला येथील विभाग नियंत्रक कार्यालयाने विभागातील सर्व आगार व्यवस्थापकांना तातडीने सूचना जारी केल्या आहेत.

सवलतीचे तिकीट बुक करताना सवलतधारक प्रवाशांचे ओळखपत्र तपासूनच त्यांना तिकीट देण्यात यावे. जर ओळखपत्र बनावट (फर्जी) आढळले, तर अशा प्रवाशांना कोणत्याही परिस्थितीत सवलतीचे तिकीट देण्यात येऊ नये. या निर्देशामुळे महामंडळाचे होणारे आर्थिक नुकसान टाळण्यास मदत मिळणार असून, बनावट ओळखपत्रांवर प्रवास करणाऱ्यांवर आता कठोर कारवाई होण्याची शक्यता आहे.

## राहेर येथील पत्रकार यांचे वडील स्व. भास्कर रामकृष्ण नागोलकार यांचे निधन



**पातुर :** पातुर तालुक्यातील राहेर येथील पत्रकार तथा अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद मुंबई संलग्न जिल्हा पत्रकार संघ सदस्य योगेश भास्कर नागोलकार यांचे वडील शेतकरी मनमिळावू स्वभाव व्यक्ती स्व. भास्कर रामकृष्ण नागोलकार वय ५७ वर्ष अल्पशा आजाराने दुःख निधन झाले. गेल्या एका वर्षापासून ते आजारी होते. त्यांचे अनेक दवाखान्यात त्यांच्या मुलांनी इलाच करण्यात आले परंतु रविवारी दि. २१ डिसेंबर रोजी पहाटेच्या सकाळी ९:१४ मि. स्व. भास्कर रामकृष्ण नागोलकार त्यांची प्राणज्योत मावळली. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, जावाई नातवंडे असा असा मोठा परिवार आहे. त्यांच्या जाण्याने गावात तसेच परिसरात हळहळ व शोकाकळा पसरली आहे.

RNI NO-46973/1986
Mahasagar Akola
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak. Printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Kamala Square, Durga Chowk, Akola. **Group Editor-in-Chief and Managing Director** - Shrikrishna Tansukhdas Chandak, **Group Editor** - Sandeep Ramrao Kale, **Managing Editor** - Pankaj Shrikrishna Chandak. **Local Editor** Purushottam Madhukarrao Dhole Phone 9881489479 (Responsible for editorial as per PRB act). Head Office Phone 7447735851, 9922970023.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७३/१९८८
महासागर अकोला
**मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, मिला स्केअर, दुर्गा चौक, अकोला, येथे प्रकाशित केले. **मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक**
**स्थानिक संपादक :** "पुरूषोत्तम मधुकरराव ढोले, फोन : ९८८१४८९४७९" (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी स्थानिक संपादकांची राहील.)

# अस्मिता

## सुरभीचा इको-फ्रेंडली कॅराग्रीन

**सुरभीची उत्पादन आणि मार्केटिंगमधील ताकद आणि चेतनाताईंची ग्राहकसंबंध व डिझाइनची कौशल्ये एकत्र आल्याने कॅराग्रीनची जोडी अधिक सक्षम झाली. कॅराग्रीनची नाविन्यपूर्ण उत्पादने आणि पर्यावरणपूरक दृष्टिकोनामुळे कंपनीची निवड 'स्टॅनफर्ड सीड स्पार्क' कार्यक्रमासाठी झाली.**

इंदूरमध्ये राहणारी सुरभी शाह ही पर्यावरणाबद्दल अतूट प्रेम बाळगणारी तरुण उद्योजिका. प्लास्टिक प्रदूषणाला पर्याय शोधण्याच्या ध्यासातून तिने कॅराग्रीन या जैविकरीत्या कुजणाऱ्या पॅकेजिंग आणि स्टेशनरी बनवणाऱ्या स्टार्टअपची स्थापना केली. आई-वडिलांकडून मिळालेली कष्टाची आणि शाश्वत जीवनमूल्यांची शिकवण तिच्या प्रवासाची पायाभरणी ठरली.



एसआरएम विद्यापीठातून आयटीची पदवी घेतल्यानंतर सुरभीने काही काळ मल्टीनॅशनल कंपनीत काम केले. त्यानंतर ती कुटुंबाच्या जुन्या व्यवसायात काम करायला सुरुवात केली. छपाई आणि पॅकेजिंग उद्योगातून निर्माण होणारा प्रचंड कचरा तिला दिसला आणि त्यातून पर्यावरणपूरक पर्याय निर्माण करण्याची ठाम प्रेरणाही मिळाली.

२०१८ मध्ये तिने कॅराग्रीन स्टार्टअपची सुरुवात केली. बियांसह वाढणारी डायरी, पेन्सिल-पेन यांसारख्या बायोडिग्रेडेबल वस्तूंसोबत तिने लोकांच्या दैनंदिन वापरातील प्लास्टिक कमी करण्यावर भर दिला. थोड्याच काळात तिच्या सासूबाई चेतना शाह व्यवसायात सहभागी झाल्या.

सुरभीची उत्पादन आणि मार्केटिंगमधील ताकद आणि चेतनाताईंची ग्राहकसंबंध व डिझाइनची कौशल्ये एकत्र आल्याने कॅराग्रीनची जोडी अधिक सक्षम झाली.कॅराग्रीनची नाविन्यपूर्ण उत्पादने आणि पर्यावरणपूरक दृष्टिकोनामुळे कंपनीची निवड स्टॅनफर्ड सीड स्पार्क कार्यक्रमासाठी झाली. याशिवाय ती भारतातील टॉप १०० महिला-नेतृत्व असलेल्या स्टार्टअपमध्ये स्थान मिळवून गौरवली गेली. इतकेच नव्हे तर 'शार्क टँक इंडिया'वर पीयूष बन्सल आणि अनुपम मित्तल यांनीदेखील कॅराग्रीनमध्ये गुंतवणूक केली. कॅरास्पून, कॅराबॉक्स यांसारखी पॅकेजिंगमधून प्लेट-चमचा बनणारी कल्पक उत्पादने सर्वांचे लक्ष वेधून घेत राहिली.कॅराग्रीनने हल्दीराम्स, बालाजी फूड्स यांसारख्या ब्रँडसोबत भागीदारीसुरू केली. पर्यावरणाबद्दल जागरूक असलेले ग्राहक आणि उद्योग दोघांनीही कॅराग्रीनवर विश्वास टाकला.आई झाल्यानंतर सुरभीचा पर्यावरणाविषयीचा संकल्प आणखी दृढ झाला. पुढील पिढ्यांसाठी स्वच्छ, सुरक्षित भविष्य देण्याच्या उद्देशाने ती शाळा-महाविद्यालयांत जाऊन तरुणांना शाश्वत जीवनशैलीबाबत मार्गदर्शन करू लागली.

मानिनी

आज कॅराग्रीनअधिक नाविन्यपूर्ण, पुनर्वापरयोग्य पॅकेजिंग तयार करण्याच्या दिशेने काम करत आहेत.
व्यवसायापलीकडे जाऊन सुरभी शाह आणि चेतनाताईशाह यांनी पर्यावरण संवर्धनाचा एक व्यापक संदेश उभा केला आहे. जिथे उत्कटता आणि उद्देश एकत्र आले, तिथे परिवर्तन आपोआप घडते हे या दोघींनी सिद्ध केले आहे.



## लग्नात बारीक दिसायचंय?

लवकरच लग्नसराईला सुरूवात होईल. लग्नात प्रत्येक नवरीला सुंदर आणि बांधेसूद दिसायचं असतं. मग लग्नाआधी काही दिवस डाएट केलं जातं. व्यायामावर भर दिला जातो. पण प्रत्येकीलाच डाएट करणं जमत नाही. मग काय करायचं? डाएट न करताही लग्नात बारीक दिसता येईल. यासाठी फॅशन आणि स्टाईलकडे थोडं लक्ष द्यायला हवं. लग्नात बारीक दिसण्यासाठी काय करायला हवं? जाणून घेऊ...

स्टाईल स्टेटमेंट

✻ लग्नातली साडी किंवा लेहंग्याची निवड काळजीपूर्वक करायला हवी. लेहंगा किंवा साडीच्या फ्रॅब्रिकमुळे तुम्ही बारीक दिसू शकता. तुम्ही सॅटिन, जॉर्जेट किंवा क्रेप फॅब्रिकच्या साड्या तसंच लेहंग्याची निवड करा. सिल्क तसंच नेटच्या कपड्यांमध्ये तुम्ही स्थूल दिसाल. त्यामुळे या कापडांचा वापर टाळा.

✻ लग्नामध्ये बऱ्याच मुली खूप भरजरी साडी किंवा लेहंग्याची निवड करतात. लग्नासारख्या विशेष प्रसंगी भरजरी साड्या किंवा लेहंगाच घालायला हवा असं काही नाही. त्यातही तुम्हाला बारीक दिसायचं असेल तर नाजूक नक्षीकाम तसंच वर्कवाल्या कपड्यांची निवड करा. लेहंगा किंवा साडीचे काठ फार मोठे नसावेत.

✻ लेहंगा आणि साडीसोबतच ब्लाउजची निवडही तितकीच महत्त्वाची आहे. नेट किंवा सी थ्रू कापडाचं ब्लाउज शिवा. बाह्या कोपरापर्यंत असाव्यात तसंच स्कूप नेकची फॅशन ट्राय करा.

✻ बारीक दिसण्यासाठी नेव्ही ब्लू, लाल, डीप वाईन लेहंग्याची निवड करा. एकाच रंगाचा लेहंगा घातल्यावर तुम्ही बारीक दिसता. कॉन्ट्रास्ट लेहंगा घालणं टाळा.

✻ चेहऱ्याचा आकार आणि ब्लाउजचा गळा यांचा विचार करून दागिने निवडा. उगाचच मोठे, बटबटीत दागिने घालू नका. चेहरा स्थूल आणि मोठा असेल तर जड आणि गोल बिंदी घालू नका. त्याऐवजी त्रिकोणी आकाराची बिंदी निवडा. चोकर्स किंवा राणी हाराची निवड करता येईल.

✻ लेहंगा घालणार असाल तर दुपट्ट्याची निवड विचारपूर्वक करा. दुपट्टा कॅरी करण्याच्या स्टाईलमुळेही तुम्ही बारीक किंवा जाड दिसू शकता.

## काय आहे गोल्ड ईटीएफ?



गुंतवणुकीच्या पर्यायांपैकी एक म्हणजे 'गोल्ड एक्स्चेंज ट्रेडेड फंड' म्हणजेच ईटीएफ. ईटीएफमध्ये ऑगस्ट महिन्यात ९०८ कोटी तर वर्षात ५३५६ कोटी रुपयांची गुंतवणूक झाली आहे.

ईटीएफद्वारे गुंतवणूकदार इलेक्ट्रॉनिक माध्यमातून सोन्याची खरेदी-विक्री करू शकतात. भारतात २००७ पासून गोल्ड ईटीएफ अस्तित्वात आहे. तसंच एनएसई आणि बीएसईमध्ये त्यांची नोंदणी झालेली आहे. म्युच्युअल फंड योजनांद्वारे गोल्ड ईटीएफ विकत घेता येतात. गोल्ड ईटीएफमधल्या गुंतवणुकीचे अनेक लाभ आहेत. सोन्याच्या इतर पर्यायांमध्ये गुंतवणूक करण्यापेक्षा ईटीएफमधली गुंतवणूक अधिक उपयुक्त ठरू शकते.

'ती'ची गुंतवणूक

ईटीएफद्वारे यूनिट्समध्ये सोनं विकत घेता येतं. अगदी एक ग्रॅम सोनंही खरेदी करता येतं. सराफा दुकानातून सोनं घेताना तुमची फसवणूक होऊ शकते. तसंच कमी प्रमाणात सोनं घेता येत नाही. गोल्ड ईटीएफची किंमत समान असते. सोनं खरेदी करताना सराफ वेगवेगळ्या किंमती आकारू शकतात. गोल्ड ईटीएफमध्ये ९९.५ टक्के शुद्ध सोनं मिळतं. ई माध्यमातून खरेदी केलेलं सोनं डिमॅट खात्यात असतं. त्यामुळे हे सोनं चोरी होण्याचा धोका नसतो. गोल्ड ईटीएफच्या खरेदी आणि विक्रीची प्रक्रिया अगदी सोपी आहे. तुम्ही डिमॅट खातं उघडून हे व्यवहार करू शकता.

हेअर केअर

## केसांना द्या नैसर्गिक रंग




केस काळे करण्याची नैसर्गिक पद्धत म्हणजे मेहंदी. मेहंदीमुळे केसांचं कंडिशनिंगही होतं. मेहंदी लावल्यानंतर पांढरे केस थोडे नारिंगी दिसतात. पण मेहंदी भिजवताना त्यात काही घटक घातल्यास तुम्हाला वेगळा रंगही मिळू शकतो. केसांना भुरकट रंग द्यायचा असेल तर तुम्ही मेहंदीमध्ये कॉफी पावडर घालू शकता किंवा कॉफी घालून पाणी उकळून घ्या. या पाण्याने मेहंदी भिजवा. यासोबतच यात थोड्या लवंगा घाला. यात आवळ्याची पूड किंवा भृंगराज पावडरही घालता येईल. यामुळे केसांना छान गडद रंग येईल.

मेक अप

## असे लपवा डाग...

चेहऱ्यावरचे डाग-धब्बे शोभून दिसत नाहीत. हे डाग मेक अपने लपवता येतील. एखाद्या समारंभासाठी तयार होताना तुम्ही काही टिप्स फॉलो करू शकता. मुलायम त्वचेसाठी गुलाब पाण्याने चेहरा धुवा. शक्यतो नैसर्गिक घटकांनी युक्त फेसवॉश वापरा. मेक अप करण्याआधी चेहरा स्वच्छ धुवा. यामुळे रोमछिद्रांमधली घाण बाहेर पडेल आणि तुमचा चेहरा उजळ दिसेल. फाउंडेशन लावण्याआधी मॉईश्चरायझरचा वापर केल्यामुळे मेक अप उत्पादनांमधल्या घातक रसायनांपासून त्वचेचा बचाव होईल. कंसीलरऐवजी पिंपल्स करेक्टरचा वापर करा. यामुळे चेहऱ्यावरील डाग लपतील आणि त्वचेला कोणताही त्रास होणार नाही.



चेहऱ्यासाठी टोनरची निवड करताना त्यात नैसर्गिक घटक आहेत ना याची खात्री करुन घ्या


किचन टिप्स

## उग्र वास घालवायचा तर...

भांडी किंवा हातांना येणारा लसूण किंवा मसाल्यांचा उग्र वास घालवण्यासाठी काही उपाय करता येतील. ओव्यामुळे लसणाचा वास जावू शकतो. यासाठी भांडी काही काळ ओव्याच्या पाण्यात बुडवून ठेवा. गरम पाण्यात थोडं लिंबू पिळून या पाण्याने हात आणि भांडी धुता येतील. लिंबाच्या रसासोबत त्याची सालंही पाण्यात घाला. या सालांनी भांडी घासा. कॉफीची पूडही भांड्यांना लावता येईल. साधारण १५ ते २० मिनिटं कॉफीची पूड भांड्यांना लावून ठेवा. मग पाण्याने धुवून टाका. यामुळे कोणताही उग्र वास निघून जाईल. संत्र्याचा सालीचा वापर करूनही लसणाचा उग्र वास घालवता येईल.



## असं जमवा मल्टीटास्किंग



आजकाल वेळ ही सगळ्यात मोठी समस्या आहे. घरकाम, नोकरी आणि मुले या तिन्ही जबाबदाऱ्या एकत्र सांभाळताना वेळ हातातून निसटतो, असे अनेक महिलांना वाटते. पण काही छोटे रूटीन, डिजिटल साधनांचा हुशारीने वापर आणि सोपे प्लॅनर्स यांच्या मदतीने कामे सोपी आणि सुलभ होऊ शकतात. वेळेवर नियंत्रण ठेवणे म्हणजे प्रत्येक गोष्ट योग्य ठिकाणी बसवणे.यासाठी मायक्रो रूटीन पासून सुरुवात करा. मोठी वेळापत्रके करण्यापेक्षा ५ किंवा १० मिनिटांची छोटी रूटीन जास्त उपयोगी ठरतात. सकाळी उठल्यावर १० मिनिटे घर आवरण्यासाठी,१५ मिनिटे टिफिनची तयारी करण्यासाठी, ५ मिनिटे कपडे ठरवण्यासाठी अशी वेळेची वाटणी करा. त्यामुळे सकाळच्या धावपळीमध्ये मोठा फरक पडतो. स्कूल बॅग स्वतः भरून ठेवणे, कपडे योग्य ठिकाणी ठेवणे, पाण्याची बाटली धुणे यासारख्या छोट्या जबाबदाऱ्या मुलांवर सोपवाव्या. त्यामुळे मुले स्वावलंबी होतात आणि तुमचा वेळही वाचतो.

स्किल डेव्हलपमेंट

डिजिटल साधने वेळ वाचवण्यात खूप मदत करतात. मोबाईल कॅलेंडरमध्ये शाळेचे प्रोजेक्ट, डॉक्टर अपॉइंटमेंट्स, बिल पेमेंट्स, ऑफिस मिटिंग्स हे सगळे रंगानुसार मार्क करून ठेवा. गूगल कीप, टू डू लिस्ट किंवा साधे छोंशी ॲप वापरा. त्यात दररोजची कामांची लिस्ट करून ठेवा. रिमाइंडर्सचा वापर करा. ऑनलाइन किराणा ॲप्स, यूटिलिटी बिल ऑटोपे आणि मील प्लॅनिंग ॲप्सचा वापर केला तर आठवड्यातले किमान २ ते ३ तास वाचतात.

मोठ्या डायरीपेक्षा तीन भागांचा साधा प्लॅनर ठेवा. घरकाम, ऑफिस काम आणि कुटुंब. त्यामुळे आज किंवा या आठवड्यात कशाला प्राधान्य द्यायचे आहे ते पटकन लक्षात येते. आठवड्यातून एकदा संडे प्लॅनिंग करा. कपडे आधी तयार ठेवणे, खर्चाचा हिशोब पाहणे, आठवड्याचा मेनू ठरवणे, मुलांच्या ॲकक्टिव्हिटी ठरवणे हे सर्व रविवारी प्लॅन केले तर संपूर्ण आठवडा शांतपणेघालवता येतो.सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे स्वतःला थकवू नका. दिवसात १० ते १५ मिनिटे मी-टाइम ठेवा. शांतपणे चहा पिणे, काही मिनिटे मेडिटेशन करणे, थोडे चालणे किंवा पुस्तकाची दोन पाने वाचणे, आवडते संगीत ऐकणे या गोष्टी स्वत:साठी करा. काम तर करायचे आहेच, पण ते पद्धतशीरपणे केले तर त्याचा आनंदही घेता येतो.

## स्मार्ट होम



स्मार्टहोम म्हणजे घरातील दैनंदिन कामे तंत्रज्ञानाच्या मदतीने स्वयंचलित आणि सोपी करणारी व्यवस्था. आजकाल अनेक घरी स्मार्ट डिव्हाइसेस वापरली जातात. स्मार्ट बल्ब, स्मार्ट प्लग, स्मार्ट डोअर लॉक, सीसीटीव्ही कॅमेरे, व्हॉइस असिस्टंट्स, स्मार्ट टीव्ही, स्मार्ट वॉशिंग मशीन अशा अनेक गोष्टी मोबाईलमधून नियंत्रित करता येतात. उदाहरणार्थ, घरातून बाहेर पडल्यानंतर गॅलरीचा लाईट बंद राहिला का, हे आठवत नसेल तर मोबाईल ॲपवर पाहून लगेच बंद करता येतो. रात्री घरी येण्यापूर्वी खोलीतील लाईट्स किंवा एसी सुरू करून ठेवता येतो. त्यामुळे वेळही वाचतो आणि ऊर्जा देखील. एखादे उपकरण दररोज ठराविक वेळी आपोआप चालू-बंद करण्यासाठी टाइमर सेट करता येतो. उदाहरणार्थ,घरातील दिवे रात्री ७ वाजता आपोआप चालू आणि ११ वाजता बंद करता येतात. सुरक्षेसाठी स्मार्टहोम साधनांची खूप मदत होते. स्मार्ट डोअरबेल कॅमेरे घराबाहेरील हालचाल दाखवतात. अनोळखी व्यक्ती दाराजवळ आली की लगेच मोबाईलवर अलर्ट येतो. स्मार्ट लॉकमुळे घराची चावी बाळगण्याची चिंता राहत नाही. पासकोड, फिंगरप्रिंट किंवा मोबाईल ॲपने घराचे लॉक उघड-बंद करता येते. अशा सुविधा महिलांसाठी उपयुक्त ठरतात. कारण सुरक्षा आणि नियंत्रण दोन्ही एका ठिकाणी मिळतात.स्मार्टहोममुळे घरकाम सुद्धा खूप सोपे होते. व्हॉइस असिस्टंटला म्युझिक लाव, रिमाइंडर सेट कर, टायमर लाव, लाईट कमी कर अशा सूचना दिल्या की ते काम ताबडतोब होते. ते काम करण्यासाठी लागणारा वेळ वाचतो. स्मार्ट वॉशिंग मशीन किंवा स्मार्ट फ्रिजमध्ये समस्येचे निदान स्वतःच केले जाते आणि मोबाईलवर मेसेज येतो. त्यामुळे उपकरण बिघडण्यापूर्वीच काळजी घेता येते. स्मार्टहोमची किंमत थोडी जास्त वाटू शकते.

टेक्नो टिप्स

पण सुरुवात स्मार्ट प्लग किंवा स्मार्ट बल्ब या सारख्या एक-दोन साधनांपासूनही करता येते. हळूहळू घरातील इतर गोष्टी अपग्रेड करता येतात. परंतु हे करताना सुरक्षित ब्रँड, डेटा प्रायव्हसी आणि विश्वासार्ह ॲप्सची निवड महत्त्वाची आहे. आजच्या काळातल्या स्मार्ट स्त्रियांसाठी स्मार्टहोम तंत्रज्ञान ही केवळ सोय नव्हे, तर गरज आहे.

## हृदयरोगाला ठेवा दूर



हृदयाची तंदुरुस्ती सर्वात महत्त्वाची आहे. हृदयविकार जडल्यावर धावाधाव करण्यापेक्षा आधीच काळजी घ्यायला हवी. हृदयाचं आरोग्य राखण्यासाठी तुम्ही काही आयुर्वेदिक उपाय करू शकता.

✻ सकाळी उठल्यानंतर तुळस आणि पुदीन्याची पानं चावून खा. यामुळे बरेच लाभ मिळतील. तुळश खूप औषधी आहे. तुळशीसोबत पुदीना खाल्ल्यास रक्तातील पीएचचं संतुलन राखलं जातं आणि धमन्यांमध्ये अडथळे निर्माण होत नाहीत.

आरोग्यवेध

✻ पिंपळाची पानंही खूप लाभदायी ठरतात. पिंपळाची तीन ते चार पानं पाण्यात उकळून घ्या. हे पाणी थंड करून प्या. यामुळे हृदयविकारापासून बचाव होऊ शकेल. पिंपळाच्या पानांचं सेवन करण्याआधी आयुर्वेदिक तज्ज्ञांचा सल्ला घ्यायला विसरू नका.

✻ हळदीतही बरेच औषधी गुण आहेत हे आपण जाणतो. सर्दी-खोकल्यासारख्या आजारात हळदीचं दूध प्यायला सांगितलं जातं. हृदयविकाराला प्रतिबंध म्हणून हळद घेता येईल. यासाठी तीन ते चार हळकुंड साधारण चार दिवस चुन्याच्या पाण्यात भिजवून ठेवा. मग हळकुंड वाळवून घ्या. वाळल्यावर हळकुंडाची पूड करा. साधारण एक ग्रॅम पूड गरम पाण्यात घालून सकाळ आणि संध्याकाळ प्या. यामुळे धमन्यांमधले ब्लॉकेज दूर होतात. हा उपायही तज्ज्ञांच्या सल्ल्यानेच करायचा आहे.

अशा पद्धतीने नैसर्गिक घटकांचा वापर करून आपण हृदयरोगाला दूर ठेऊ शकतो.

## फेस मास्कचे लाभ मिळवण्यासाठी...



त्वचा आणि उजळपणासारखे लाभ मिळवण्यासाठी आपण फेस मास्क लावतो. पण काही चुकांमुळे या फेस मास्कचे लाभ मिळत नाहीत. फेस मास्कचा वापर करताना जाणतेअजाणतेपणी होणाऱ्या चुकांविषयी...

✻ त्वचेच्या प्रकारानुसार फेस मास्कची निवड करायला हवी. फेस मास्क लावताना आपण त्वचेकडे लक्षच देत नाही आणि तिथेच सगळी गडबड होते. कोरड्या त्वचेसाठी ओलावा देणारा म्हणजेच हायड्रेटिंग फेस मास्क हवा. तेलकट त्वचेसाठी मेटिफाय क्ले मास्क अधिक उपयुक्त ठरू शकतो. त्यामुळे फेस मास्क लावण्याआधी आपल्या त्वचेचा पोत जाणून घ्या.


ब्युटी टॉक

✻ मास्क लावण्याआधी चेहरा आणि हात स्वच्छ धुवून घ्या. अस्वच्छ हातांनी फेस मास्क लावल्यास धुलीकण, जंतू चेहऱ्यावर बसतात. यामुळे चेहऱ्यावर मुरूमं, पुटकुळ्या येऊ शकतात.

✻ फेस मास्कमध्ये वापरल्या जाणाऱ्या घटकांच्या प्रमाणाकडेही लक्ष द्या. मास्क कमी प्रमाणात तयार झालं असेल तर तुम्हाला सर्व लाभ मिळणार नाहीत. अतिरिक्त मास्कमुळे त्वचा खेचल्यासारखी वाटेल. चेहऱ्यावर मास्कचा समान थर द्या.

✻ चेहऱ्यावरील मास्क वाळल्यानंतर लगेच धुवून टाका. मास्क बराच काळपर्यंत ठेवल्याच त्वचा कोरडी पडून खेचल्यासारखी वाटते. मास्क जास्त काळ ठेवल्याने अधिक लाभ होतात हा एक गैरसमज आहे. यासोबतच फेसमास्कची पॅच टेस्ट करून बघा. त्वचा लाल होणं, मुरूमं येणं अशा समस्या उद्भवल्या नाहीत तर पुढे जा.

## मस्त बनाना कप केक



मैत्रिणींनो, केळी पटकन पिकतात. जास्त पिकलेली केळी खावीशी वाटत नाहीत.पण आता याच केळ्यांपासून मस्तपैकी बनाना कप केक तयार करता येईल.

**साहित्य :** दोन पिकलेली केळी, एक कप रवा, दोन चमचे दही, दोन चमचे तेल, अर्धा कप साखर, एक छोटा चमचा बेकिंग सोडा, अर्धा चमचा वेलची पूड, थोडे टूटीफ्रूटी.

**कृती :** पिकलेल्या केळ्यांची सालं काढून केळी नीट कुस्करून घ्या. दुसऱ्या भांड्यात रवा घेऊन त्यात दही घाला. (रव्याऐवजी मैदा किंवा गव्हाचं पीठही वापरता येईल.)

रसगंधा

रवा आणि दह्याच्या मिश्रणात तेल घाला. मग साखर घाला. केळीही गोड असतात. त्यामुळे साखर चवीनुसार घाला. या मिश्रणात वेलची पूड घाला. मग पाणी घालून मिश्रण फेटून घ्या. शेवटी यात कुस्करलेली केळी घालून मिसळून घ्या. सजावटीसाठी वरून टुटीफ्रूटी घाला. हे मिश्रण १५ मिनिटं बाजूला ठेऊन द्या.आता यात बेकिंग सोडा घाला. जाड बुडाच्या कढईत मीठ घालून पसरवून घ्या. कढई गॅसवर ठेवा. मीठ गरम करून घ्या. यावेळी कढईवर झाकण ठेवा. पॅन केकच्या साच्याला थोडं तेल लावून घ्या. मग केकचं मिश्रण त्यात घाला. कप केकचे साचे नसल्यास वाट्यांचा वापर करता येईल. कढईमध्ये ताटली ठेवा. त्यावर केकचे साचे किंवा वाट्या ठेवा. वरून झाका. साधारण २५ ते ३० मिनिटं मंद आचेवर शिजू द्या. चमचा किंवा सुरीने केक तयार झाल्याची खात्री करून द्या. केक थंड होऊ द्या. कुटुंबासोबत बसून या केकचा आस्वाद घ्या.

# ठाकरे बंधूंची युती ही निवडणूक फंडा

**चंद्रशेखर बावनकुळे यांची सडकून टीका**



■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २४ :**
भाजपचे ज्येष्ठ नेते तथा राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी ठाकरे बंधूंच्या युतीवर सडकून टीका केली आहे. ठाकरे बंधूंची युती ही केवळ निवडणुकीचा फंडा आहे. मुंबई महाराष्ट्रापासून तोडता येणार नाही हे ४ वर्षांच्या पोरालाही कळते. उद्धव ठाकरे यांची ही कॅसेट आता जुनी झाली आहे. या घिसीपिटी कॅसेटला आता कुणीही विचारत नाही, असे ते म्हणालेत.

उद्धव व राज ठाकरे यांनी आज आपल्या राजकीय युतीची घोषणा केली. यावेळी त्यांनी मुंबईला महाराष्ट्र, मराठी माणसांपासून तोडणाऱ्यांच्या राजकीय खात्म्याचा निर्धार व्यक्त केला. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी त्यांच्या या विधानाचा खरपूस समाचार घेतला.

ते पत्रकारांशी बोलताना म्हणाले, ठाकरे बंधूंची युती हा केवळ निवडणुकीचा फंडा आहे हे जनतेला माहिती झाले आहे. संपूर्ण महाराष्ट्राला संपूर्ण देशाच्या 4 वर्षाच्या पोराला सुद्धा कळते व महाराष्ट्राच्या जनतेलाही कळते की, मुंबई ही महाराष्ट्रापासून कधीच वेगळी होऊ शकत नाही. हे कुणीही करू शकत नाही.

उद्धव ठाकरेंची ही कॅसेट आता जुनी झाली आहे. त्या घिसीपिटी कॅसेटला आता कुणी विचारत नाही. व्होटचोरी व मुंबई महाराष्ट्रापासून तोडणे या दोन गोष्टी आता लोकांना पटत नाही. त्यांनी कितीही निवडणुकीचा मुद्दा बनवला, तरी उपयोग होणार नाही. उद्धव ठाकरे प्रत्येक निवडणुकीत असे बोलतात त्याला काही अर्थ नाही.

**ठाकरेंना स्वतःची माणसे सांभाळता येत नाही**

ते म्हणाले, उद्धव ठाकरेंना स्वतःची माणसे सांभाळता येत नाहीत. त्यांना त्यांची लोकं सांभाळता येत नाहीत. म्हणून ते या पद्धतीने बोलत आहेत. जनतेचा व कार्यकर्त्यांचा विश्वास उद्धव ठाकरे यांनी स्वतःच संपवला आहे. त्यामुळे त्यांचे कार्यकर्ते व नेते त्यांना सोडून गेलेत. त्यामुळे त्यांनी आत्मचिंतन केले पाहिजे. आपल्याला लोकांनी का सोडले. आपल्याला आमदारांनी का सोडले, आपल्याला गावोगावचे लोकं का सोडत आहेत याचा त्यांनी विचार केला पाहिजे.

आज एवढी परिस्थिती वाईट आहे की, नगरपरिषद व नगरपंचायती निवडणुकीत नगराध्यक्षपदाची निवडणूक लढवण्यासाठीही त्यांच्याकडे उमेदवार नव्हता. त्यामुळे मुंबई तोडण्याचा मुद्दा गौण ठरणार आहे. त्यांच्या बोलण्याला काही अर्थ नाही.

**महाराष्ट्रात भावनिक राजकारण चालणार नाही**

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, महाराष्ट्रात भावनिक आवाहन चालणार नाही. जनता भावनेच्या आधारावर मतदान करत नाही. महाराष्ट्रातील जनता सुजान आहे. विकसित मुंबईलाच मतदान करणार आहेत. देवेंद्र फडणवीस हेच विकसित महाराष्ट्र व विकसित मुंबई करू शकतात. हे मराठी माणसांना व मतदारांना माहिती आहे. आम्ही सर्वजण मराठी माणसे आहोत. आम्ही इंग्रजी लोकं आहोत का? आम्ही महाराष्ट्राचे मराठी माणसे आहोत. महायुतीमधील सर्वच लोकं मराठी माणसे आहेत. त्यामुळे मराठी- मराठी करून तुम्ही मराठी भाषेचाही अपमान केला.

स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा अपमान तुम्ही केला. त्यामुळे काहीही होणार नाही. मतदान भावनेच्या मुद्यावर होणार नाही. हे मतदान विकसित मुंबईसाठी होणार आहे. त्यांची पार वाट लागणार आहे. ठाकरे यांच्या पक्षाला महाराष्ट्राच्या इतिहासातील सर्वात किंचित बहुमत मिळणार असल्याचेही ते म्हणाले.

# तब्बल ७.८३ कोटींची वीज चोरी उघडकीस

■ **महासागर प्रतिनिधी अकोला, दि. २३ :**
अकोला परिमंडळात गेल्या आठ महिन्यात तब्बल १५२० जणांकडून वीज चोरी करण्यात आली आहे. या प्रकरणांतून सात कोटी ८३ लाख रुपयांची आकारणी करण्यात आली. वीज चोरी विरोधात मोहीम तीव्र करण्याचे निर्देश मुख्य अभियंता राजेश नाईक यांनी दिले आहेत.

थेट वीज वाहिनीवर हूक टाकून वीज जोडण्या, मीटरमध्ये छेडछाड करून अनधिकृत वीज वापर करणा ?यांवर अकोला परिमंडळांतर्गत अकोला, बुलढाणा आणि वाशीम जिल्ह्यात मोहीम राबविण्यात आली. एप्रिल २०२५ पासून १५२० जणांनी थेट वीज चोरी किंवा मीटरशी छेडछाड केली असल्याचे निष्पन्न झाले. विद्युत कायदा २००३ कलम १३५ अंतर्गत केलेल्या कारवाईत वीज देयकासह दंडात्मक कारवाईपोटी सात कोटी ८३ लाखाची आकारणी केली.

त्यातील १३२४ प्रकरणात ७ कोटी सात लाखाची वसुली झाली. वीज देयकासह तजजोड शुल्क न भरल्याने १० प्रकरणात वीज चोरीसाठी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २ कोटी ९६ लाखाच्या ७५१ वीज चोऱ्या बुलढाणा जिल्ह्यात उघड झाल्या.



अकोला जिल्ह्यात दोन कोटी ५८ लाखाच्या ४९९ वीज चोरीची प्रकरणे असून वाशीम जिल्ह्यात २७० प्रकरणात दोन कोटी २९ लाखांची वीज चोरी झाली आहे. वीज चोरीमुळे होणाऱ्या अतिरिक्त वीज वापराचा विपरीत परिणाम होऊन महावितरणची यंत्रणा कोलमडते.

सुरळीत वीज पुरवठ्याला अडथळा निर्माण होतो. याशिवाय महावितरणला करोडो रुपयांचे आर्थिक नुकसान सहन करावे लागते. त्यामुळे महावितरणने या विरोधात मोहीम सुरू केली असून त्यात अडथळा न आणू नये, असा इशारा महावितरणने दिला आहे.

वीज मीटर मध्ये फेरफार अथवा छेडखानी करणे हा विद्युत विद्युत २००३ नुसार गुन्हा असून या अंतर्गत संबंधित वीज ग्राहकावर कलम १३५ अन्व्ये फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येतो. तसेच या ग्राहकांना मीटर रीडिंगच्या दुप्पट रक्कम आकारण्यात येते. प्रति केडब्ल्यू/एचपी नुसार औद्योगिक ग्राहकावर १० हजार, वाणिज्यिक ग्राहकावर पाच हजार रुपये,कृषी ग्राहकावर १ हजार रुपये तर इतर ग्राहकावर दोन हजार रुपये दंडात्मक कारवाई केली जाते.

गुन्हा सिद्ध झाल्यास तीन वर्षांपर्यंतच्या शिक्षेची तरतूद वीज कायद्यात आहे. वीज मीटरमध्ये फेरफार करण्यासाठी गुन्हा दाखल करण्याची तरतूद आहे.

# ४ मुले जन्माला घालण्याची सुरुवात त्यांनी स्वतःच्या घरातून करावी...




■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २४ :**
भाजप नेत्या आणि माजी खासदार नवनीत राणा या नेहमीच त्यांच्या आक्रमक वक्तव्यामुळे चर्चेत असतात. आता पुन्हा एकदा त्यांनी एका वादग्रस्त विधान केले आहे.

एका मुस्लिम मौलानाने केलेल्या वक्तव्याचा दाखला देत नवनीत राणा यांनी हिंदूंनी किमान ३ किंवा ४ मुले जन्माला घालावीत असे आवाहन केले. त्यांच्या या वक्तव्यामुळे नव्या वादाला तोंड फुटले आहे. अल्पसंख्यांक आयोगाचे अध्यक्ष प्यारे खान यांनी नवनवीन राणा यांच्या वक्तव्याचा निषेध करत दोन समाजात तेढ निर्माण करण्याचा हा प्रकार असून दुसऱ्यांना उपदेश करण्यापेक्षा इतकेच असेल तर त्यांनी स्वतःच्या घरातून याची सुरुवात करावी, अशा शब्दात पलटवार केला.

नवनीत राणा म्हणाल्या, मौलाना सय्यद कादरी यांनी त्यांना ४ बायका आणि १९ मुले असल्याचं म्हटलं आहे. त्यांचा हिंदुस्थानाला पाकिस्तान बनवण्याचा आहे. ते लोक मोठ्या संख्येने मुले जन्माला घालत आहे. तर मग हिंदूंनी एका मुलावर संतुष्ट का व्हावे? त्यामुळे हिंदूंनी आता किमान चार मुले जन्माला घातली पाहिजे, असे अजब आवाहन नवनीत राणा यांनी केले आहे. त्यांच्या या वक्तव्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली असमाना प्यारे खान यांनी पलटवार केला आहे.

# मुंबईला गुजरातच्या दावणीला बांधण्याचा प्रयत्न : वडेट्टीवार



■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २४ :**
महाराष्ट्रावर ,मुंबईवर अतिक्रमण सुरू आहे. मुंबई बळकावण्याचा, मुंबईला गुजरातच्या दावणीला बांधण्याचे काम सुरू आहे.त्यामुळे मुंबई वाचवण्यासाठी, तिचे रक्षण करण्यासाठी लढले पाहिजे अस काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार म्हणाले.

नागपुरात माध्यमांशी बोलताना वडेट्टीवार यांनी महायुती सरकारच्या धोरणावर टीका केली. मुंबईतील जमिनी गिळण्याचे काम सुरू आहे,मुंबईवर गुजरातचे नियंत्रण आता दिसू लागले आहे.त्यामुळे मराठी अस्मिता, मराठी संस्कृती रक्षणासाठी लढावे लागणार.मुंबईत उद्धवजी ठाकरे आणि राज ठाकरे हे बंधू एकत्र आले त्यांना आमच्या शुभेच्छा आहेत. कुटुंब एकत्र येत असेल तर आनंदच आहे.मुंबई महापालिका निवडणुकीसाठी काँग्रेसची तयारी ही उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांच्या पक्षाबरोबर निवडणूक लढण्याची होती,मनसे बाबत मात्र जाण्याची काँग्रेसची तयारी नव्हती अस वडेट्टीवार यांनी यावेळी बोलताना स्पष्ट केले.

विजय वडेट्टीवार यांनी यावेळी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत मित्रपक्ष वेगवेगळे लढत असले तरी त्यामुळे इंडिया आघाडी किंवा महाविकास आघाडीला कोणताही धक्का बसणार नसल्याचाही दावा केला. ते म्हणाले, लोकसभा निवडणुकीत इंडिया आघाडी होती,विधान सभा निवडणुकीत महाविकास आघाडी होती. पण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या कार्यकर्त्यांच्या असतात. नगरपरिषद, नगरपालिका निवडणुकीत महाविकास आघाडी एकत्र लढली नाही, आघाडीचे निर्णय हे स्थानिक पातळीवर असतात. यातून इंडिया आघाडी किंवा महाविकास आघाडीला धक्का लागला अस मानण्याचे कारण नाही.

काँग्रेस हा पक्ष जातीयवाद, धर्मवाद करत नाही. काँग्रेस हा संविधान मानणारा आणि प्रत्येक घटकाला न्याय देणारा पक्ष आहे त्यामुळे येणाऱ्या निवडणुकीत विकासासाठी आमच्या पाठीशी जनतेने उभे रहावे असे आवाहन यावेळी काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केले.

# चार महिन्यांपूर्वी बदल्या होवूनही शिक्षक अडकूनच

■ **महासागर प्रतिनिधी, बुलढाणा, दि. २४ :**
राज्य शासनाच्या ग्रामविकास विभागामार्फत शैक्षणिक सत्र २०२४-२५ साठी राबवण्यात आलेल्या ऑनलाईन पद्धतीने चार महिन्यापूर्वी बदल्या झाल्या. मात्र दोन आदिवासी बहुल तालुक्यातील बदल्या झालेल्या शिक्षकांना संबंधित पंचायत समितीच्या गट शिक्षण अधिकाऱ्यांनी कार्यमुक्तच केले नसल्याचे धक्कादायक वृत्त आहे.

ऑनलाईन पद्धतीने बदल्या प्रक्रियेला जळगाव जामोद आणि संग्रामपूर तालुक्यात हरताळ फासला जात असल्याचे चित्र समोर आले आहे. बदल्या होऊन चार महिने उलटले, तरी या दोन तालुक्यातील शिक्षकांना कार्यमुक्त करण्यात आले नाही. यामुळे अमरावती विभाग पदवीधर मतदारसंघाचे आमदार धीरज लिंगाडे हे संतप्त झाल्याचे आज बुधवारी पाहवयास मिळाले.

त्यांनी शिक्षक संघटनेच्या पदाधिका ?यांना सोबत घेत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांची भेट घेऊन जाब विचारला. ऑनलाईन बदल्या संदर्भातील धोरणाला यंत्रणाकडूनच सर्रास हरताळ फासण्यात आल्याबद्धल विधान परिषद सदस्य धीरज लिंगाडे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. शिक्षकांवर होणारा हा अन्याय दूर करण्यासाठी त्यांनी गुलाब खरात यांना धारेवर धरले. वरिष्ठांच्या आदेशांची अंमलबजावणी का केली जात नाही? असा सवाल करत, कार्यमुक्त करण्याचे निर्देश त्यांनी यावेळी जिल्हा परिषद प्रशासनाला दिले.

# जल संवर्धनासाठी मंथन

**लोकजागर**



मर्यादित जलसंपत्तीची उपलब्धता आणि गेल्या तीस वर्षांत सांबर सरोवराच्या आसपासच्या भागात पर्जन्यमानात झालेली घट यामुळे पाण्याची समस्या अधिकच गंभीर झाली आहे. भूजलाची गुणवत्ताही खालावली आहे, कारण फ्लोराईड्स आणि क्षारांचे प्रमाण सातत्याने वाढत आहे.

प्रचलित सामाजिक समस्यांमुळे सुरक्षित पिण्याच्या पाण्याची उपलब्धता सर्वांना समान प्रमाणात होत नाही. जलसंपत्तीचे संवर्धन सुनिश्चित करण्यासाठी आणि ते सर्वांना उपलब्ध करून देण्यासाठी, मंथन संस्थेने दोन कार्यक्रम सुरू केले आहेत पाणलोट क्षेत्र विकास आणि रिव्हर्स ऑस्मोसिस प्रकल्प. यामुळे समुदायांना त्यांच्या पारंपरिक उपजीविका टिकवून ठेवण्यासही मदत होईल.

पाण्याच्या टंचाईचा आणि गुणवत्तेतील घसरणीचा परिणाम विविध घटकांवर झाला आहे - स्थानिक पर्यावरण, समुदायांचे आरोग्य आणि शेतकरी व पशुपालकांची आर्थिक स्थिती. म्हणूनच, गोड्या पाण्याचे साठे निर्माण करण्यासाठी एक दीर्घकालीन पर्जन्यजल संचयन प्रकल्प सुरू करण्यात आला.

या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याचे समन्वय 'फाउंडेशन फॉर रूरल रिकव्हरी अँड डेव्हलपमेंट' नवी दिल्ली यांनी केले आणि त्याला कोका-कोला फाउंडेशनने निधी दिला. राजस्थानमधील अजमेर, जयपूर आणि नागौर जिल्ह्यांच्या आसपासच्या १५ गावांमध्ये २४ संरचना (बंधारे, तलाव आणि छोटे धरणे) बांधण्यात आल्या.

या प्रकल्पाचे फायदे बहुआयामी आहेत. या प्रकल्पामुळे पाण्याची गुणवत्ता सुधारली आहे. यामुळे शेती आणि पशुपालन यांसारख्या पारंपरिक उपजीविकांना पुनरुज्जीवन मिळाले आहे. तसेच, पाणलोट क्षेत्राच्या ठिकाणी आणि शेतीच्या कामांमध्ये रोजंदारीवर काम करणाऱ्यांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या आहेत.

प्रकल्पाच्या सुरुवातीपासून, एकूण ७७३ दशलक्ष लिटर पाण्याची साठवण क्षमता निर्माण झाली आहे आणि १.२ अब्ज लिटर पाणी जमा करण्यात आले आहे. या प्रकल्पाद्वारे २४ गावांमध्ये ५४,००० हून अधिक लोकांच्या जीवनावर सकारात्मक परिणाम झाला आहे.

सांबर खारट सरोवराच्या आसपासच्या भागातील पिण्याचे पाणी खारट झाले आहे, ज्यामुळे गावकऱ्यांसाठी गोड्या पाण्याचे कोणतेही स्रोत उरलेले नाहीत. मंथन संस्थेने बेअरफूट कॉलेज आणि सेंट्रल सॉल्ट अँड मरिन केमिकल रिसर्च इन्स्टिट्यूट यांच्या सहकार्याने ४ गावांमध्ये (कोटडी, भोपा की ढाणी, झाग आणि सिनोदिया) सौरऊर्जेवर चालणारे रिव्हर्स ऑस्मोसिस (फ्ह) प्रकल्प स्थापित केले.

हे प्रकल्प भूजलातील क्षार आणि फ्लोराईड्स गाळून पाणी पिण्यायोग्य बनवतात. मंथन संस्थेने स्थानिक समुदायाला हे प्रकल्प व्यवस्थापित आणि चालवण्यासाठी प्रशिक्षणही दिले. या उपक्रमामुळे आता ४०० लोकांना ५००० लिटर स्वच्छ पाणी उपलब्ध झाले आहे. ■ ■

# संकटांवर मात करत प्रिंटिंग व्यवसायाला दिली नवी दिशा



यश परुळेकर सध्या वयाच्या पंचविशीतील असले तरी एखाद्या अनुभवी उद्योजकाला लाजवेल, असे त्यांचे काम आहे. आजोबांनी स्थापन केलेल्या कारखान्याचा आणि दुकानाचा विस्तार यश यांनी केला. आजोबा-वडील-मुलगा अशा परुळेकर यांच्या तीन पिढ्या कोल्हापुरातील या कागद उद्योगाच्या समूहात झाल्या आहेत. यश परुळेकर हे या उद्योगातील तिसरे पिढीतले.

परुळेकर कुटुंबीय मुळचे कोकण विभागातील कुडाळ जिल्ह्यातील परुळे गावचे होय. कामानिमित्त ते कोल्हापुरात स्थायिक झाले. कोल्हापुरात यश यांचे आजोबा रघुनाथ दत्तात्रय परुळेकर यांनी नेता स्टोअर्स या नावाने सुरुवातीला शैक्षणिक साहित्याचे दुकान सुरु केले. पुढे १५-१६ वर्षांनंतर त्यांनी शिरोली एमआयडीसी येथे नेता प्रिटींग प्रेस नावाने कारखाना उभा केला. हे दोन्ही व्यवसाय आजतागायत अविरतपणे सुरु आहेत.

त्यावेळी त्यांच्या कारखान्यामध्ये वेगवेगळ्या कंपन्यांना आणि शाळा-महाविद्यालयांना लागणाऱ्या फाईल्स, नोटबुक, जनरल रजिस्टर तयार होत असत. स्टीचिंगपासून प्रिंटिंगपर्यंत सर्व काही या कारखान्यामध्येच केले जायचे. हाच माल विक्रीसाठी पुन्हा त्यांच्याच नेता स्टोअर्स या नावाने असलेल्या दुकानात जात असे.

यासाठी रघुनाथ यांचे पुत्र गिरीश परुळेकर हे त्यांना मदत करु लागले. पण, २०११ मध्ये गिरीश परुळेकर यांचे अपघाती निधन झाले. त्यावेळी अगदी कठीण परिस्थिती ओढावली. कारण रघुनाथ हे वयस्कर झाले होते.

यश परुळेकर जेमतेम आठवीत तर त्यांची बहिण गीता बारावीमध्ये शिक्षण घेत होती. त्यामुळे दुकानाची संपूर्ण जबाबदारी यश यांच्या आईवर येऊन पडली. उद्योगधंद्याचा अनुभव नसतानाही यश यांच्या आईने आपले कारखाना आणि दुकान नेटाने पुढे नेले.

शिक्षण घेता घेता त्यांनी दुकान आणि कारखान्याकडे लक्ष केंद्रित केले. यासाठी त्यांना प्रभाकर खानोलकर यांची खूप मदत मिळाली.

रघुनाथ परुळेकर यांनी सन १९६७ मध्ये शिरोली एमआयडीसी येथे प्लॉट घेतला होता. काही वर्षांनंतर तेथे नेता प्रिंटींग प्रेस हा छोटेखानी कारखाना सुरु करण्यात आला. केवळ एका प्रिंटिंग मशीनवर हा करखाना उभारला गेला.

पुढे पुढे जसजशी प्रगती होत गेली तशी उद्योगात आणखी वाढ झाली. आता छापखान्यात नवे मोठे रुलिंग (कागदावर रेषा आखणारे मशीन), स्टीचिंग, प्रिंटिंग, कटिंगचे मशीन्स आहेत. त्यापैकी स्पीड ऑफ ग्राफ या मशीनवर बेसिक फॉर्म, पेपर प्रिंटिंग करण्यात येते.

ऑफसेट मशीन वर रजिस्टर प्रिंटिंग, फॉर्म प्रिंटींग, फाईल्सचे प्रिंटिंग केले जाते. शिवाय, अकाऊंट बुक्स, शाळेचे रजिस्टर, सर्व प्रकारचे ऑफिस हॉटेल लागणारे रजिस्टर, येथे तयार केले जातात. विविध फॉर्म, सर्व्हिस बुक, रजिस्टर तयार करण्यासाठी लागणारी सरकारी परवानगी कोल्हापुरात केवळ परुळेकर यांच्याकडेच आहे. असे हे कोल्हापुरातील पहिलेच शासकीय मान्यता असणारे दुकान आहे, असे म्हणायला हरकत नाही.

नेता प्रिंटिंग प्रेस कारखान्यात सध्या सहा जण काम करतात तर नेता स्टोअर्स या दुकानात ५ जण काम करतात. कारखान्यामध्ये विवाह वही, प्सेसमेंट बुक, भिशी रजिस्टर, व्हाऊचर बुक, पावती बुक, बॉक्स फाईल, ऑफिस फाईल, पगारपत्रक, आय नमूना रजिस्टर, दूध खरेदी-विक्री रजिस्टर, कॅशमेमो, दूध व्यक्तिगत तपासणी वही, दाखला बुक, शाळेतील मुलांची माहिती वही, प्रोसेसिंग बुक, रजिस्टर, फार्म्स, फाईल्स, फोल्डर तयार होतात. असे एकूण दोन ते अडीच हजार वस्तू विक्रीसाठी नेता स्टोअर्स दुकानामध्ये उपलब्ध आहेत.

यामध्ये मुख्यत्वे, सर्व्हिस बुक्सची सर्वाधिक विक्री होते. (सर्व्हिस बुक म्हणजे एखाद्या कामगाराचे एखाद्या कंपनीत नोकरी लागल्यापासून त्याची इत्थंभूत माहिती सर्व्हिस बुकमध्ये नोंद करून ठेवली जाते. प्रत्येक कंपनीसाठी लागणारे हे सर्व्हिस बुक असते) शिवाय शाळेसाठी लागणारे अटेंडन्स बुक, जनरल्स बुक्सची सवार्त जास्त विक्री होते. त्याचबरोबर, वाईन शॉप्स, बिअर बार, परमिट रूमचे रजिस्टर बनवले जाते.

या कारखान्यात तयार होणारी उत्पादने कोल्हापूर, कराड, सांगली, सातारा, रत्नागिरी, सिंधुदुर्ग कोकण भागात विक्रीसाठी जातात. नेता प्रिंटिंग प्रेस कारखान्याचा जवळपास ४० लाख तर दुकानाचा जवळपास ३५ लाख इतका टर्न ओवर आहे. अशा प्रकारे विविध संकटे येऊन आर्थिक गणित कोलमडले तरीही परुळेकर यांनी हार न मानता आहे तोच उद्योग पुन्हा नव्या जोमाने पुढे सुरु ठेवला आहे. ■ ■ ■

**: संकलन व संयोजन :**
**सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६**
subodh.ranshevre @rediffmail.com

# वंचितकडून उमेदवारांची पहिली यादी



■ **महासागर प्रतिनिधी अकोला, दि. २४ :**
महापालिका निवडणुकीसाठी वंचित आघाडीची राज्यातील पहिली यादी बुधवारी जाहीर करण्यात आली. अकोला महापालिकेसाठी वंचितने पाच उमेदवारांची नावे पहिल्या यादीत घोषित केले.

काँग्रेस व इतर पक्षांसोबत आघाडी करण्यावर अनिश्चिततेचे सावट कायम आहे. भाजप वगळता इतर पक्षांशी आघाडी करण्यासाठी तयार आहोत. मात्र, कुठल्याही पक्षाकडून योग्य प्रस्तावच आला नसल्याची माहिती वंचित आघाडीचे जिल्हा प्रभारी नातिकोद्दिन खतीब यांनी पत्रकार परिषदेत दिली.

महापालिका निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली आहे. इच्छुकांसह राजकीय पक्षांकडून जोरदार तयारी केली जात आहे. युती व आघाडीचे चित्र अद्याप स्पष्ट झाले नाही. काँग्रेस व वंचित आघाडी एकत्रित येणार असल्याची चर्चा असतांनाच आज वंचित आघाडीने उमेदवारांची पहिली यादी जाहीर करून पुढचे पाऊल टाकले.

# एमपीएससी अध्यक्षांसोबत बैठक

## वयोमर्यादा सवलतीबाबत दोन दिवसांत निर्णय

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २४ :**
महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) संयुक्त पूर्व परीक्षा (गट ब) २०२५ च्या नागपूरः महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) संयुक्त पूर्व परीक्षा (गट ब) २०२५ च्या जाहिरातीमध्ये एकूण ६७४ पदे जाहीर झाली असून त्यात पोलीस उपनिरीक्षकांसाठी (पीएसआय) ३९२ पदांचा समावेश आहे.

या परीक्षेदरम्यान वयोमर्यादा ओलांडलेल्या विद्यार्थ्यांना एकवेळची विशेष संधी देण्याची मागणी परीक्षार्थ्यांनी केली आहे. याबाबत राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्या पत्रानंतर आता आयोगाच्या अध्यक्षांकडे बैठकीसाठी वेळ मागण्यात आली असून वयाच्या सवलतीबाबत सकारात्मक निर्णय होण्याची शक्यता आहे.

सामान्यतः ही जाहिरात डिसेंबर-जानेवारीत येते. त्यानंतर परीक्षा मार्च-मे महिन्यात होते. यावर्षी मात्र जाहिरात २९ जुलै २०२५ रोजी निघून परीक्षा ४ जानेवारीला होणार आहे. सर्वात गंभीर बाब म्हणजे वयोमयार्दा मोजण्यासाठी १ नोव्हेंबर २०२५ ही तारीख निश्चित केली आहे. यामुळे गेल्या ३-४ वर्षांपासून तयारी करणाऱ्या हजारो विद्यार्थ्यांचे वय १-२ महिन्यांनी अधिक झाले असून ते आपोआप अपात्र ठरत आहेत. त्यावर तोडगा काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

# आसमान फाउंडेशनतर्फे निराधार मुलांना ब्लँकेट वाटप




■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २४ :**
नागपुरातील आसमान फाउंडेशनच्या वतीने वर्धा येथे दिवसेंदिवस वाढत्या थंडीमुळे वर्धा येथील आसमान फाउंडेशन तर्फे गोर गरीबांना ब्लँकेट व निराधार मुलांना स्वेटर वाटप करीत आहे.

यानुसार वर्धा येथील दत्तपुर में कुष्ठरोग रुग्णालय व पुनर्वसन केंद्रांतील कुष्ठरोगींना व आसमंत स्नेहालयातील निराधार वरिष्ठ नागरिक व मुलांना ब्लँकेट वितरीत केले गेले. तसेच श्रीछाया बालगृहातील मूक-बधीर मुलांना कोल्ड क्रीम, मिठाईचे वाटप केले. याप्रसंगी अध्यक्ष डॉ. रवि गिऱ्हे आसमान फाउंडेशन, सचिव नरेश शेंडे, अखई पटेल, वर्धा शाखा प्रभारी श्याम चंद्रा, आसमान महिला क्रेडिट सोसायटीच्या अध्यक्षा मेघा गि?हे, दिनेश टेकाडे, निलेशजी व वर्धा स्थित सदस्य उपस्थित होते.

वर्धा फाउंडेशनच्या शाखेतर्फे निरंतर जिल्ह्यातील गरीब, निराधार मुलांना, महिलांना व वरिष्ठ नागरिकांना जनसहयोगतून सहकार्य केले जाते.

# सराफा व्यावसायिकाची बनावट फोन पे ॲपद्वारे फसवणूक



■ **महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. २४ :**
सोन्याची अंगठी खरेदी केल्यानंतर बनावट फोन पे ॲपद्वारे पैसे भरल्याचे भासवून सराफा व्यावसायिकाची फसवणूक करणाऱ्या दोन सराईत गुन्हेगारांना अमरावती ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने बेड्या ठोकल्या आहे.

अंजनगाव सुर्जी येथे ही घटना घडली होती. पोलिसांनी अवघ्या २४ तासांत आरोपींना जेरबंद करून त्यांच्याकडून सोन्याची अंगठी आणि दुचाकीसह १.३१ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. उमेर मिर्झा जाफर बेग मिर्झा (३६, रा. सागर नगर, हैदरपुरा) आणि मोहम्मद शोएब मोहम्मद शकील (३६, नालसाबपुरा, अमरावती) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.

अंजनगाव सुर्जी येथील गोपाल नगर भागात राजेश जानराव बैतुले यांचे गुणगुण ज्वेलर्स नावाचे दुकान आहे. २३ डिसेंबरला सायंकाळी दोन तरूण त्यांच्या दुकानात आले. त्यांनी सोन्याची अंगठी पाहण्याचा बहाणा केला आणि ४८ हजार रुपये किमतीची ३.३२० ग्रॅमची अंगठी पसंत केली. पैसे देण्याची वेळ आली असता त्यांनी आपल्या मोबाईलमधील बनावट फोन पे ?पवरून व्यवहार यशस्वी झाल्याचे बैतुले यांना दाखवले. पैसे खात्यात जमा झाल्याचा आभास निर्माण करून दोघेही दुचाकीवरून पसार झाले. मात्र, काही वेळाने बैतुले यांनी बँक खाते तपासले, तेव्हा फसवणूक झाल्याचे बैतुले यांच्या लक्षात आले आणि त्यांनी पोलिसांत धाव घेतली.

घटनेचे गांभीर्य ओळखून पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी तातडीने गुन्हे शाखेला तपासाचे आदेश दिले. स्थानिक गुन्हे शाखेचे प्रमुख पोलीस निरीक्षक किरण वानखडे यांनी तांत्रिक पुराव्यांच्या आधारे अमरावती शहर गुन्हे शाखेच्या मदतीने सापळा रचला. अमरावती येथील महाजनपुरा परिसरातून जात असताना या दोन्ही संशयितांना ताब्यात घेण्यात आले. पोलिसी खाक्या दाखवताच त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली.